# संत योहान ह्याचे शुभवर्तमान

१ प्रारंभी शब्द होता, शब्द देवाबरोबर होता, आणि शब्द देव होता. २तोच प्रारंभी देवाबरोबर होता. ३त्याच्या द्वारे सर्व झाले; आणि झाले असे काहीदेखील त्याच्याशिवाय झाले नाही. ४त्याच्या ठायी जीवन होते; आणि ते जीवन मनुष्यांचा प्रकाश होते. ५तो प्रकाश अंधारात प्रकाशतो; पण अंधाराने त्याला ग्रासले नाही.

६देवाकडून पाठविलेला एक मनुष्य प्रगट झाला; त्याचे नाव योहान. ७तो स्वतः साक्षीसाठी, त्या प्रकाशाविषयी साक्ष द्यावी म्हणून आला; म्हणजे सर्वांनी त्याच्या द्वारे विश्वास ठेवावा. ८तो स्वतः तो प्रकाश नव्हता, पण, तो त्या प्रकाशाविषयी साक्ष द्यावी म्हणून आला.

९जो प्रत्येक मनुष्याला प्रकाश देतो तो खरा प्रकाश जगात येणार होता. १०तो जगात होता, त्याच्या द्वारे जग झाले; पण जगाने त्याला ओळखले नाही. ११तो जे त्याचे स्वतःचे होते तेथे आला, पण जे त्याचे स्वतःचे होते त्यांनी त्याचा स्वीकार केला नाही. १२पण जितक्यांनी त्याचा स्वीकार केला, म्हणजे त्याच्या नावावर विश्वास ठेवला, तितक्यांना त्याने देवाची मुले होण्याचा हक्क दिला. १३त्यांचा जन्म रक्ताकडून किंवा देहाच्या इच्छेकडून, किंवा मनुष्याच्या इच्छेकडून नाही, पण देवाकडून झाला आहे.

१४आणि शब्द देही झाला व त्याने आमच्यात वसती केली; तो कृपा व सत्य ह्यांनी परिपूर्ण होता. आम्ही त्याचे गौरव, ते पित्याच्या एकुलत्याचे असे गौरव आम्ही पाहिले. १५योहान त्याच्याविषयी साक्ष देतो आणि ओरडून म्हणतो,

"ज्याच्याविषयी मी म्हणालो की, 'माझ्या मागून जो येत आहे तो माझ्या पुढचा झाला आहे कारण तो माझ्या पूर्वी होता', तो हा आहे."

१६आपल्या सर्वांना त्याच्या पूर्णतेतून कृपेवर कृपा प्राप्त झाली. १७कारण नियमशास्त्र मोशेच्या द्वारे दिले गेले; कृपा व सत्य ही येशू ख्रिस्ताच्या द्वारे आली. १८कोणीही देवाला कधी पाहिले नाही. पण जो देवाचा एकुलता आपल्या पित्याच्या उराशी असतो त्याने त्याला प्रगट केले आहे.

१९आणि योहानाची साक्ष ही आहेः जेव्हा यहुद्यांनी यरुशलेमहून याजक व लेवी ह्यांना त्याला विचारायला धाडले की,

"आपण कोण आहा?"

२०तेव्हा त्याने उघड सांगितले, नाकारले नाही, पण उघड सांगितले,

"मी ख्रिस्त नाही."

२१आणि त्यांनी त्याला विचारले,

"मग कोण? आपण एलिया आहा काय?"

आणि तो म्हणतो,

"मी नाही."

"आपण तो संदेष्टा आहा काय?"

आणि त्याने उत्तर दिले,

"मी नाही."

२२तेव्हा ते त्याला म्हणाले,

"आपण कोण आहा? म्हणजे ज्यांनी आम्हाला धाडलं त्यांना आम्ही उत्तर देऊ. आपण स्वतःविषयी काय सांगता?"

२३तो म्हणाला,

"यशया संदेष्ट्यानं म्हटल्याप्रमाणं 'मी तो रानात ओरडणाऱ्याचा आवाज, प्रभूचा मार्ग नीट करा.' "

२४आणि ज्यांना पाठविले होते ते परोश्यांकडचे होते. २५आणि त्यांनी त्याला प्रश्न करून म्हटले,

"आपण जर ख्रिस्त नाही, किंवा एलिया नाही, किंवा तो संदेष्टा नाही, तर आपण बाप्तिस्मा का करता?"

२६योहान त्यांना उत्तर देऊन म्हणाला,

"मी पाण्यानं बाप्तिस्मा करतो, पण तुम्ही ज्याला ओळखीत नाही असा एक जण तुमच्यात उभा आहे. २७तो माझ्या मागून येणारा आहे. आणि त्याच्या वहाणांची वादी सोडायला मी लायक नाही."

२८योहान जेथे बाप्तिस्मा करी त्या यार्देनेच्या पलीकडील
बेथानीत ह्या गोष्टी झाल्या.

२९दुसऱ्या दिवशी तो येशूला आपल्याकडे येताना
पाहतो आणि म्हणतो,

"बघा, जगाचं पाप वाहणारा देवाचा कोकरा!
३०ज्याच्याविषयी मी म्हणालो की, 'माझ्या मागून एक
जण येत आहे तो माझ्या पुढचा झाला आहे कारण तो
माझ्या पूर्वी होता' तो हा आहे. ३१मी त्याला ओळखीत
नव्हतो; पण तो इस्राएलात प्रगट व्हावा म्हणून मी पाण्यानं
बाप्तिस्मा करीत आहे."

३२आणि योहान साक्ष देऊन म्हणाला,

"मी पाहिलं की, आत्मा कबुतरासारखा आकाशातून
उतरला आणि त्याच्यावर राहिला. ३३मी त्याला ओळखीत
नव्हतो, पण मी पाण्यानं बाप्तिस्मा करावा म्हणून ज्यानं
मला धाडलं त्यानं मला सांगितलं की, 'तू ज्याच्यावर
आत्मा उतरला आणि राहिला हे बघशील तोच पवित्र
आत्म्यानं बाप्तिस्मा करणारा आहे.' ३४आणि मी पाहिलं
आहे, आणि साक्ष दिली आहे की, हा देवाचा पुत्र आहे."

३५पुन्हा दुसऱ्या दिवशी योहान व त्याच्या
शिष्यांतले दोघे उभे होते; ३६आणि येशू चालला असता
त्याने त्याच्याकडे न्याहाळून पाहिले, आणि तो म्हणतो,

"बघा, देवाचा कोकरा!"

३७त्या दोन शिष्यांनी तो बोलला ते ऐकले. आणि ते
येशूच्या मागोमाग गेले. ३८तेव्हा येशू वळला, आणि
त्यांना मागोमाग येताना पाहून, तो त्यांना म्हणतो,

"तुम्ही काय शोधता?"

ते त्याला म्हणाले,

"रब्बी, (म्हणजे गुरू) आपण कुठं राहता?"

३९तो त्यांना म्हणतो,

"या आणि पहा."

ते गेले आणि त्यांनी तो कोठे राहतो ते बघितले आणि ते
त्या दिवशी त्याच्याबरोबर राहिले; कारण, तो दहाव्या
तासाचा सुमार होता.

४०योहानाचे बोलणे ऐकून त्याच्यामागे जाणाऱ्या दोन
शिष्यांत शिमोन पेत्राचा भाऊ अंद्रिया हा एक होता. ४१तो
आपला भाऊ शिमोन ह्याला प्रथम भेटतो व त्याला
म्हणतो,

"आम्हाला मशिहा (म्हणजे ख्रिस्त) सापडला
आहे."

४२आणि त्याने त्याला येशूकडे आणले; येशूने त्याच्याकडे
न्याहाळून पहात म्हटले,

"तू योहानाचा पुत्र शिमोन आहेस. तुला केफा
(म्हणजे खडक) म्हणतील."

४३दुसऱ्या दिवशी तो गालिलात जायचे ठरवतो;
आणि त्याला फिलिप आढळतो; तेव्हा येशू त्याला
म्हणतो,

"माझ्यामागं ये."

४४आता, फिलिप बेथसैदाचा, म्हणजे अंद्रिया व पेत्र
ह्यांच्या गावचा होता. ४५फिलिपाला नथनेल आढळतो
आणि तो त्याला म्हणतो,

"मोशेनं नियमशास्त्रात, आणि तसंच संदेष्ट्यांनी
ज्याच्याविषयी लिहिलं आहे तो योसेफाचा पुत्र नासरेथकर
येशू आम्हाला सापडला आहे."

४६आणि नथनेल त्याला म्हणतो,

"नासरेथमधून काही चांगली गोष्ट निघू शकेल
काय?"

फिलिप त्याला म्हणतो,

"ये आणि बघ."

४७नथनेल आपल्याकडे येत आहे हे येशूने बघितले,
आणि तो म्हणतो,

"बघा, खरोखर इस्राएली, ह्याच्यात कपट नाही."

४८नथनेल त्याला म्हणतो,

"आपण मला कुठून ओळखता?"

येशूने त्याला उत्तर देऊन म्हटले,

"तुला फिलिपानं बोलावलं त्याआधी तू अंजिराच्या
झाडाखाली होतास तेव्हा मी तुला बघितलं."

४९नथनेलाने त्याला उत्तर दिले,

"रब्बी, आपण देवाचे पुत्र आहा, आपण इस्राएलाचे
राजे आहा."

५०येशूने त्याला उत्तर देऊन म्हटले,

"मी तुला म्हटलं की, मी तुला अंजिराच्या
झाडाखाली बघितलं म्हणून तू विश्वास ठेवतोस काय? तू
ह्याहून मोठ्या गोष्टी पाहशील."

५१आणि तो त्यांना म्हणतो,

"मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो, तुम्ही ह्यापुढं
आकाश उघडलेलं आणि देवाचे दूत मनुष्याच्या पुत्रावरून
चढत उतरत असलेले पहाल."

२ आणि तिसऱ्या दिवशी गालिलातील काना
येथे एक लग्न होते, आणि येशूची आई तेथे होती.
२आणि येशूला व त्याच्या शिष्यांनाही लग्नाला
बोलावण्यात आले होते. ३आणि त्यांचा द्राक्षारस कमी
पडला; तेव्हा येशूची आई त्याला म्हणते,
"त्यांच्याजवळ द्राक्षारस नाही."
४येशू तिला म्हणतो,
"बाई, तुला माझ्याशी काय करायचं आहे? माझी
घटका अजून आलेली नाही."
५त्याची आई सेवकांना म्हणते,
"हा तुम्हाला सांगतो ते करा."
६आता यहुद्यांच्या शुद्धिकरणाच्या नियमाप्रमाणे तेथे
पाण्याच्या, सहा, दगडी कुंड्या ठेवलेल्या होत्या, त्यात
प्रत्येकी दोन किंवा तीन घागरी मावत असत. ७येशू त्यांना
म्हणतो,
"ह्या कुंड्या पाण्यानं भरा."
आणि त्यांनी त्या काठोकाठ भरल्या. ८तेव्हा तो त्यांना
म्हणतो,
"आता काढून भोजनकारभाऱ्याकडे घेऊन जा."
आणि ते घेऊन गेले.
९आता ज्या पाण्याचा द्राक्षारस झाला त्याची जेव्हा
भोजनकारभाऱ्याने चव घेतली, आणि तो कोठला होता हे
त्याला माहीत नव्हते, (पण ज्या सेवकांनी पाणी काढले
त्यांना समजले होते) तेव्हा भोजनकारभारी वराला
बोलावतो, १०आणि त्याला म्हणतो,
"कोणीही मनुष्य अगोदर चांगला द्राक्षारस देतो,
आणि लोक सुस्त झाल्यावर हलका देतो; पण आपण
आतापर्यंत चांगला द्राक्षारस राखला आहे."
११गालिलातील काना येथे येशूने हा आपल्या
चिन्हांचा प्रारंभ केला व आपले गौरव प्रगट केले; आणि,
त्याच्या शिष्यांनी त्याच्यावर विश्वास ठेवला.

१२ह्यानंतर, तो व त्याची आई, आणि त्याचे भाऊ
व त्याचे शिष्य खाली कपर्णहूमला गेले; पण ते तेथे फार
दिवस राहिले नाहीत.

१३आता यहुद्यांचा वल्हांडण सण आला होता
आणि येशू यरुशलेमला वर गेला. १४आणि त्याला मंदिरात
गुरे, मेंढरे आणि कबुतरे विकणारे, त्याचप्रमाणे सराफ
बसलेले आढळले. १५तेव्हा त्याने एक, लहान दोऱ्यांचा
कोरडा करून सगळ्यांना त्यांच्या मेंढरांगुरांसकट
मंदिरामधून बाहेर घालवले; त्याने सराफांचे पैसे ओतले
आणि मेज उलथले १६व त्याने कबुतरे विकणाऱ्यांना
म्हटले,
"ह्यांना इथून काढा. तुम्ही माझ्या बापाचं घर हे
व्यापाराचं घर करू नका."
१७आणि त्याच्या शिष्यांना आठवले की, 'मला
तुझ्या मंदिराची ईर्ष्या गिळील' असे लिहिले आहे.
१८तेव्हा यहुद्यांनी उत्तर दिले आणि ते त्याला
म्हणाले,
"तू हे करतोस तर आम्हाला चिन्ह काय
दाखवतोस?"
१९येशूने त्यांना उत्तर देऊन म्हटले.
"तुम्ही हे मंदिर मोडा, आणि मी ते तीन दिवसांत उभं
करीन."
२०तेव्हा यहुदी म्हणाले,
"शेहेचाळीस वर्षं हे मंदिर बांधलं जात होतं; आणि तू
ते तीन दिवसांत उभं करशील काय?"
२१पण तो आपल्या शरिराच्या मंदिराविषयी बोलला.
२२म्हणून तो हे बोलला होता ह्याची त्याच्या शिष्यांना तो
मेलेल्यांतून पुन्हा उठल्यावर आठवण झाली; आणि त्यांनी
शास्त्रलेखावर व येशूने उच्चारलेल्या वचनावर विश्वास
ठेवला.

२३आता वल्हांडण सणाच्या वेळी, तो यरुशलेमात
असता, त्याने केलेली चिन्हे पाहून पुष्कळ जणांनी त्याच्या
नावावर विश्वास ठेवला. २४पण येशूने त्यांच्यावर भिस्त
ठेवली नाही; कारण तो सगळ्यांना ओळखीत होता.
२५आणि कोणी कोणा मनुष्याविषयी साक्ष द्यावी ह्याची
त्याला गरज नव्हती; कारण मनुष्यात काय आहे हे तो
ओळखीत होता.

३ आता तेथे निकदेम नावाचा एक परोश्यांपैकी
मनुष्य होता; तो यहुद्यांचा एक अधिकारी होता. २तो
रात्रीचा त्याच्याकडे आला व त्याला म्हणाला,
"रब्बी, आपण देवाकडून आलेले शिक्षक आहा हे
आम्ही जाणतो; कारण आपण जी चिन्हं करीत आहा ती
कोणीही मनुष्य, त्याच्याबरोबर देव असल्याशिवाय करू
शकणार नाही."
३येशूने त्याला उत्तर देऊन म्हटले,

"मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो, कोणीही मनुष्य पुन्हा जन्मल्याशिवाय देवाचं राज्य बघू शकणार नाही."

[४]निकदेम त्याला म्हणतो,

"मनुष्य मोठा झाल्यानंतर कसा जन्मू शकेल? त्याला आपल्या आईच्या उदरात पुन्हा जाववेल काय? आणि जन्म घेववेल काय?"

[५]येशूने उत्तर दिले,

"मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो, कोणीही मनुष्य पाण्यापासून आणि आत्म्यापासून जन्मल्याशिवाय तो देवाच्या राज्यात येऊ शकत नाही. [६]देहापासून जन्मलेला देह आहे, आणि आत्म्यापासून जन्मलेला आत्मा आहे. [७]तुम्हाला पुन्हा जन्मलं पाहिजे, असं मी तुम्हाला म्हटलं ह्याचं आश्‍चर्य करू नका. [८]वारा पाहिजे तिकडे वाहतो आणि तुम्ही त्याचा आवाज ऐकता, पण तो कोठून येतो आणि कुठं जातो हे तुम्हाला कळत नाही. आत्म्यापासून जन्मलेल्या, प्रत्येक मनुष्याचं असंच आहे."

[९]निकदेमाने त्याला उत्तर देऊन म्हटले,

"ह्या गोष्टी कशा होऊ शकतील?"

[१०]येशूने त्याला उत्तर देऊन म्हटले,

"तुम्ही इस्राएलाचे गुरू आहा, आणि ह्या गोष्टी जाणत नाही? मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो, आम्ही जे जाणतो ते आम्ही बोलतो, आणि आम्ही जे पाहिलं आहे त्याची साक्ष देतो; पण तुम्ही आमची साक्ष स्वीकारीत नाही. [१२]मी पृथ्वीवरच्या गोष्टी जर तुम्हाला सांगितल्या तर तुम्ही विश्‍वास ठेवीत नाही; मग, मी स्वर्गातल्या गोष्टी जर तुम्हाला सांगितल्या तर तुम्ही विश्‍वास कसा ठेवाल? [१३]जो मनुष्याचा पुत्र स्वर्गातून आला त्याच्याशिवाय कोणीही मनुष्य स्वर्गात चढलेला नाही. [१४]आणि मोशेनं रानात जसा साप वर चढवला तसाच मनुष्याचा पुत्र वर चढवला गेला पाहिजे, [१५]ह्यासाठी की, जो कोणी विश्‍वास ठेवतो त्याला त्याच्या ठायी सनातन जीवन मिळावं."

[१६]कारण देवाने जगावर एवढी प्रीती केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला ह्यासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्‍वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सनातन जीवन मिळावे. [१७]कारण देवाने पुत्राला जगात पाठवले ते जगाचा न्याय करायला नाही, पण त्याच्या द्वारे जगाचे तारण व्हावे म्हणून पाठवले.

[१८]जो त्याच्यावर विश्‍वास ठेवतो त्याचा न्याय होणार नाही, पण जो विश्‍वास ठेवीत नाही त्याचा न्याय झालेलाच आहे; कारण, त्याने देवाच्या एकुलत्या पुत्राच्या नावावर विश्‍वास ठेवला नाही. [१९]आणि न्याय हा आहे की, जगात प्रकाश आला आहे; पण मनुष्यांना प्रकाशापेक्षा अंधार आवडला, कारण त्यांची कामे वाईट होती; [२०]कारण वाईट करणारा प्रत्येक मनुष्य प्रकाशाचा द्वेष करतो, आणि आपल्या कृतींचा दोष दाखवला जाऊ नये म्हणून तो प्रकाशाकडे येत नाही. [२१]पण जो सत्य आचरतो तो आपली कामे देवाच्या ठायी केली गेली आहेत हे प्रगट व्हावे म्हणून प्रकाशाकडे येतो.

[२२]ह्यानंतर येशू व त्याचे शिष्य यहुदियाच्या प्रांतात आले; तो तेथे त्यांच्याबरोबर राहिला आणि बाप्तिस्मा करू लागला.

[२३]आणि योहानदेखील शालिमाजवळ, एनोन येथे बाप्तिस्मा करीत होता; कारण तेथे पाणी पुष्कळ होते आणि लोक तेथे येऊन बाप्तिस्मा घेत. [२४](कारण तोपर्यंत योहान तुरुंगात टाकला गेला नव्हता.)

[२५]तेव्हा योहानाच्या शिष्यांचा तेथे एका यहुद्याबरोबर शुद्धिकरणाविषयी वाद झाला. [२६]आणि, ते योहानाकडे येऊन त्याला म्हणाले,

"रब्बी, यार्देनेच्या पलीकडे जो आपल्याबरोबर होता आणि आपण ज्याच्याविषयी साक्ष दिली तो, बघा, बाप्तिस्मा करीत आहे आणि त्याच्याकडे सगळे जात आहेत."

[२७]योहानाने उत्तर देऊन म्हटले,

"मनुष्याला कोणतीही गोष्ट स्वर्गातून देण्यात आल्याशिवाय ती मिळू शकत नाही. [२८]मी ख्रिस्त नाही, पण मी त्याच्या पुढं पाठविलेला आहे, असं मी म्हणालो, ह्याची तुम्हीच माझ्याविषयी साक्ष द्याल. [२९]ज्याला वधू आहे तो वर; पण जो उभा राहतो आणि त्याचं ऐकतो तो वराचा मित्र होय. तो वराचा आवाज ऐकून आनंदित होतो; म्हणून माझा हा आनंद पूर्ण झाला आहे. [३०]त्यानं वाढत गेलं पाहिजे आणि मी कमी होत गेलं पाहिजे."

[३१]जो वरून येतो तो सर्वांच्या वर आहे. जो पृथ्वीवरचा आहे तो पृथ्वीचा आहे आणि पृथ्वीवरचे बोलतो. जो स्वर्गातून येतो तो सर्वांच्या वर आहे. [३२]त्याने जे पाहिले आहे व ऐकले आहे त्याविषयी तो साक्ष देतो, आणि, कोणीही त्याची साक्ष स्वीकारीत नाही. [३३]ज्याने त्याची साक्ष स्वीकारली आहे त्याने 'देव खरा आहे' ह्यावर आपला शिक्का लावला आहे. [३४]कारण ज्याला देवाने पाठविले आहे तो देवाचे शब्द बोलतो. कारण तो मापाने

आत्मा देत नाही. [३५]पिता पुत्रावर प्रीती करतो आणि त्याने सर्व गोष्टी त्याच्या हातांत दिल्या आहेत. [३६]जो पुत्रावर विश्वास ठेवतो त्याला सनातन जीवन आहे; पण जो पुत्राचा अवमान करतो तो जीवन पाहणार नाही, पण देवाचा क्रोध त्याच्यावर राहतो.

४ तेव्हा, येशू योहानापेक्षा अधिक शिष्य करीत होता व त्यांचा बाप्तिस्मा करीत होता हे परोश्यांनी ऐकले होते, हे जेव्हा प्रभूला समजले, [२](तरी, येशू स्वतः बाप्तिस्मा करीत नव्हता पण त्याचे शिष्य करीत होते) [३]तेव्हा त्याने यहुदिया सोडला आणि तो पुन्हा गालिलात जायला निघाला.

[४]आणि त्याला शोमरोनामधून प्रवास करणे जरूर होते. [५]आणि तो शोमरोनातल्या सुखार नावाच्या गावी येतो. ते याकोबाने आपला मुलगा योसेफ ह्याला दिलेल्या शेताजवळ होते. [६]तेथे याकोबाची विहीर होती. म्हणून प्रवासाने दमलेला येशू तसाच त्या विहिरीजवळ बसला, तेव्हा सुमारे सहावा तास होता.

[७]तेथे एक शोमरोनी बाई पाणी शेंदायला येते. येशू तिला म्हणतो,

"मला प्यायला दे."

[८](कारण त्याचे शिष्य गावात अन्न विकत घ्यायला गेले होते.) [९]आणि ती शोमरोनी बाई त्याला म्हणते,

"आपण यहुदी असून माझ्याजवळ, एका शोमरोनी बाईजवळ प्यायला मागता, हे असं कसं?"

(कारण यहुदी शोमरोन्यांचे काही समाईक वापरीत नव्हते.)

[१०]येशूने तिला उत्तर देऊन म्हटले,

"देवाचं दान काय आहे, आणि मला प्यायला दे असं तुला म्हणणारा कोण आहे, हे तुला समजलं असतं तर तू त्याच्याजवळ मागितलं असतंस आणि त्यानं तुला जिवंत पाणी दिलं असतं."

[११]ती बाई त्याला म्हणते,

"महाराज, आपल्याजवळ शेंदायला काही नाही, आणि विहीर खोल आहे, मग आपल्याजवळ ते जिवंत पाणी कुठून? [१२]आपले पूर्वज याकोब ह्यांच्याहून आपण मोठे आहा काय? त्यांनी ही विहीर आम्हाला दिली; आणि ते स्वतः, त्यांचे पुत्र, आणि त्यांची जनावरं हिचं पाणी पीत असत."

[१३]येशूने तिला उत्तर देऊन म्हटले,

"जो कोणी हे पाणी पिईल त्याला पुन्हा तहान लागेल, [१४]पण जो मनुष्य मी त्याला देईन ते पाणी पिईल त्याला कधीही तहान लागणार नाही. तर मी जे पाणी त्याला देईन ते त्याच्या ठायी जीवनासाठी उपळत्या पाण्याचा झरा होईल."

[१५]ती बाई त्याला म्हणते,

"महाराज, मला ते पाणी द्या, म्हणजे मला तहान लागणार नाही, आणि मी इथं शेदायला येणार नाही."

[१६]तेव्हा तो तिला म्हणतो,

"जा, तुझ्या नवऱ्याला बोलव, आणि इकडे ये."

[१७]त्या बाईने उत्तर देऊन त्याला म्हटले,

"मला नवरा नाही."

येशू तिला म्हणतो,

"तू ठीक बोललीस की, 'मला नवरा नाही'; [१८]कारण तुला पाच नवरे होते, आणि तुझ्याजवळ आता आहे तो तुझा नवरा नाही - हे तू खरं बोललीस."

[१९]ती बाई त्याला म्हणते,

"महाराज, मी समजते की, आपण कोणी संदेष्टे आहा. [२०]आमचे पूर्वज ह्या डोंगरावर उपासना करीत आणि, तुम्ही म्हणता की, जिथं उपासना केली पाहिजे ते स्थान यरुशलेमात आहे."

[२१]येशू तिला म्हणतो,

"बाई, माझ्यावर विश्वास ठेव. तुम्ही ह्या डोंगरावर आणि यरुशलेमात पण पित्याची उपासना करणार नाही, अशी घटका येत आहे. [२२]तुम्ही ज्याला ओळखीत नाही त्याची उपासना करता; आम्ही ज्याला ओळखतो त्याची उपासना करतो. कारण यहुद्यांतून तारण आहे. [२३]पण जेव्हा खरे उपासक आत्म्यानं आणि खरेपणानं पित्याची उपासना करतील अशी घटका येत आहे, आणि आता आलीच आहे; कारण अशांनी आपली उपासना करावी अशी पित्याची इच्छा आहे. [२४]देव आत्मा आहे; आणि जे त्याची उपासना करतात त्यांनी आत्म्यानं आणि खरेपणानं त्याची उपासना केली पाहिजे."

[२५]ती बाई त्याला म्हणते,

"मी जाणते की, मशिहा (म्हणजे ख्रिस्त) येणार आहे; तो येईल तेव्हा तो सर्व गोष्टी आम्हाला सांगेल."

[२६]येशू तिला म्हणतो,

"तुझ्याशी बोलणारा मी तो आहे."

२७त्यावर त्याचे शिष्य आले, आणि तो एका
बाईशी बोलत होता ह्याचे त्यांनी आश्चर्य केले पण, कोणी
असे म्हटले नाही की, 'तू काय विचारतेस?' किंवा 'आपण
तिच्याशी काय बोलता?' २८त्या बाईने तेव्हा आपला
पाण्याचा घडा सोडला आणि ती नगरात गेली, आणि
लोकांना म्हणते,

२९"या, एका मनुष्याला भेटा; त्यानं मला मी जे काही
केलं ते सगळं सांगितलं. हा ख्रिस्त असेल काय?"
३०तेव्हा ते नगरातून बाहेर निघाले व त्याच्याकडे येऊ
लागले.

३१मध्यंतरी त्याचे शिष्य त्याला विनंती करून
म्हणाले,

"रब्बी, खाऊन घ्या."
३२पण तो त्यांना म्हणाला,

"तुम्हाला माहीत नाही असं, मला खायला,
माझ्याजवळ अन्न आहे."
३३तेव्हा शिष्य एकमेकांस म्हणाले,

"ह्याला कोणी खायला आणून दिलं काय?"
३४येशू त्यांना म्हणतो,

"ज्यानं मला धाडलं आहे, त्याच्या इच्छेप्रमाणं
करणं, आणि त्याचं काम पूर्ण करणं हे माझं अन्न आहे.
३५'अजून चार महिने आहेत आणि कापणी येईल', असं
तुम्ही म्हणता ना? बघा, मी तुम्हाला सांगतो, तुमचे डोळे
वर करून ही शेतं पहा; कारण ती, आधीच, कापणीसाठी
पांढरी झाली आहेत. ३६कापणी करणारा वेतन मिळवतो
आणि सनातन जीवनासाठी पीक गोळा करतो; म्हणजे जो
पेरतो आणि जो कापतो त्यांनी बरोबर आनंद करावा.
३७आणि ह्या बाबतीत, 'एक पेरतो आणि दुसरा कापतो',
ही म्हण खरी आहे. ३८तुम्ही ज्यावर कष्ट केले नाहीत ते
कापायला मी तुम्हाला पाठवलं. दुसऱ्यांनी कष्ट केले
आणि त्यांच्या कामात तुम्ही गेला आहा."

३९तेव्हा जिने साक्ष दिली की, 'त्यानं मला मी जे
काही केलं ते सगळं सांगितलं', त्या बाईच्या
बोलण्यावरून नगरातल्या पुष्कळ शोमरोन्यांनी त्याच्यावर
विश्वास ठेवला. ४०म्हणून शोमरोनी त्याच्याकडे आले,
तेव्हा त्यांनी त्याला आपल्याबरोबर राहायची विनंती
केली; आणि तो तेथे दोन दिवस राहिला. ४१आणि,
आणखी पुष्कळ जणांनी त्याच्या शब्दांवरून विश्वास
ठेवला. ४२आणि ते त्या बाईला म्हणाले,

"आता आम्ही तुझ्या बोलण्यावरून विश्वास ठेवतो
असं नाही; कारण आम्ही त्याचं ऐकलं आहे, आणि हा,
खरोखर, जगाचा तारणारा आहे, हे आम्हाला समजलं
आहे."

४३मग, त्या दोन दिवसांनंतर, तो तेथून गालिलात
गेला. ४४कारण येशूने स्वतः साक्ष दिली की, संदेष्ट्याला
स्वतःच्या देशात मान नसतो. ४५आता, तो गालिलात
आला, तेव्हा गालीलकरांनी त्याचे स्वागत केले; कारण
त्याने सणात यरुशलेमात केलेल्या सर्व गोष्टी त्यांनी
पाहिल्या होत्या; कारण ते वर सणाला गेले होते.

४६तेव्हा, तो गालिलातील काना येथे पुन्हा आला.
तेथे त्याने पाण्याचा द्राक्षारस केला होता. तेव्हा एक
अंमलदार होता, आणि त्याचा मुलगा कपर्णहूमला आजारी
होता. ४७त्याने ऐकले की, येशू यहुदियातून गालिलात
आला आहे; तेव्हा तो त्याच्याकडे आला, आणि त्याने
खाली येऊन आपल्या मुलाला बरे करावे अशी त्याने
विनंती केली. कारण तो मरायला टेकला होता. ४८तेव्हा
येशू त्याला म्हणाला,

"तुम्ही लोक चिन्हं आणि अद्भुतं बघितल्याशिवाय
विश्वास ठेवणार नाही."
४९तो अंमलदार त्याला म्हणतो,

"महाराज, माझा बाळ मरायच्या आधी आपण खाली
या."
५०येशू त्याला म्हणतो,

"जा, आपला मुलगा वाचला आहे."
तेव्हा तो मनुष्य, त्याला येशूने म्हटलेल्या शब्दांवर
विश्वास ठेवून, आपल्या मार्गाने गेला. ५१आणि तो खाली
जात असता त्याला त्याचे दास भेटले, आणि त्याला
म्हणाले की, आपला मुलगा वाचला आहे. ५२तेव्हा
कोणत्या तासापासून त्याच्यात सुधारणा होऊ लागली
म्हणून त्याने त्यांना प्रश्न केला. आणि ते त्याला म्हणाले,

"काल, सातव्या ताशी त्याचा ताप निघाला."
५३तेव्हा बापाला समजले की, 'आपला मुलगा वाचला
आहे' असे येशू त्याला म्हणाला होता त्या ताशी होय.
आणि त्याने स्वतः व त्याच्या सर्व घराण्याने विश्वास
ठेवला.

५४येशू यहुदियातून गालिलात आल्यावर त्याने पुन्हा
जे दुसरे चिन्ह केले ते हे होय.

५ त्यानंतर यहुद्यांचा एक सण होता आणि येशू यरुशलेमला वर गेला.

२आता, यरुशलेमात, 'मेंढरे' तळ्याजवळ, ज्याला इब्री भाषेत बेथेस्दा म्हणतात ते ठिकाण आहे. त्याला पाच पडव्या आहेत. ३त्यांत आजाऱ्यांचा, अंधळ्यांचा, पांगळ्यांचा आणि लुळ्यांचा एक घोळका पडलेला होता. ४-५आणि तेथे एक मनुष्य होता; त्याला अडतीस वर्षे एक व्याधी होती. ६तो पडला होता हे येशूने बघितले व तो आता बराच काळ तसा होता हे त्याने ओळखले, तेव्हा तो त्याला म्हणतो,

"तुला बरं व्हायची इच्छा आहे काय?"

७त्या आजारी मनुष्याने त्याला उत्तर दिले,

"महाराज, पाणी हालवलं जातं तेव्हा मला तळ्यात सोडायला माझ्याजवळ कोणी नाही; आणि मी स्वतः जातो तेव्हा दुसरा माझ्या आधी जातो."

८येशू त्याला म्हणतो,

"ऊठ, तुझं बाजलं उचल आणि चाल."

९आणि, लगेच, तो मनुष्य बरा झाला व आपले बाजले उचलून चालला; आणि त्या दिवशी शब्बाथ होता.

१०तेव्हा जो बरा झाला होता त्याला यहुदी म्हणाले,

"हा शब्बाथ आहे, आणि तू हे बाजलं उचलणं योग्य नाही."

११पण त्याने त्यांना उत्तर दिले,

"ज्यानं मला बरं केलं तोच मला म्हणाला, 'तुझं बाजलं उचल आणि चाल'."

१२त्यांनी त्याला विचारले,

"तुला जो 'उचल आणि चाल' म्हणाला तो मनुष्य कोण आहे?"

१३पण तो कोण होता हे जो बरा झाला होता त्याला कळले नव्हते; कारण त्या ठिकाणी घोळका असल्यामुळे येशू निघून गेला होता. १४त्यानंतर येशूला तो मंदिरात आढळतो आणि तो त्याला म्हणाला,

"बघ, तू बरा झाला आहेस; तुला काही अधिक वाईट होऊ नये म्हणून ह्यापुढं पाप करू नकोस."

१५तो मनुष्य निघून गेला, आणि ज्याने त्याला बरे केले होते, तो येशू होता, हे त्याने यहुद्यांना सांगितले. १६आणि ह्या कारणावरून यहुद्यांनी येशूचा पाठलाग केला, कारण त्याने हे शब्बाथ दिवशी केले होते. १७पण येशूने त्यांना उत्तर दिले,

"माझा पिता अजूनपर्यंत काम करीत आहे, आणि मी काम करीत आहे."

१८म्हणून ह्या कारणावरून यहुद्यांनी त्याला ठार मारायचा अधिक प्रयत्न केला; कारण त्याने शब्बाथ मोडला एवढेच नाही, पण देवाला स्वतःचा पिता म्हणून त्याने स्वतःला देवासमान केले होते.

१९म्हणून येशूने त्यांना उत्तर देऊन म्हटले,

"मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो, पुत्र पित्याला जे करताना पाहतो त्याशिवाय तो स्वतः काही करू शकत नाही; कारण तो जे काही करतो ते त्याचा पुत्रही करतो. २०कारण पिता पुत्रावर प्रीती करतो आणि तो स्वतः जे काही करतो ते त्याला दाखवतो. आणि तुम्ही आश्चर्य करावं म्हणून तो ह्याहून मोठी कामं तुम्हांला दाखवील. २१कारण पिता जसा मेलेल्यांना उठवतो आणि जिवंत करतो तसा पुत्रही त्याला जे पाहिजेत त्यांना जिवंत करतो. २२कारण पिता कोणाचा न्याय करीत नाही, पण त्यानं पुत्रावर सर्व न्याय सोपवला आहे. २३म्हणजे सर्वांनी, जसा ते पित्याला मान देतात तसा पुत्राला मान द्यावा. जो पुत्राला मान देत नाही तो ज्यानं त्याला धाडलं त्या पित्याला मान देत नाही. २४मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो, जो माझं वचन ऐकतो आणि ज्यानं मला धाडलं त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याला सनातन जीवन आहे, आणि तो न्यायात येणार नाही; पण मरणातून जीवनात गेला आहे.

२५"मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो, जेव्हा मेलेले देवाच्या पुत्राचा आवाज ऐकतील अशी घटका येत आहे, आणि आता आलीच आहे, आणि जे ऐकतील ते जिवंत होतील. २६कारण जसं पित्याला स्वतःच्या ठायी जीवन आहे तसं पुत्राला स्वतःच्या ठायी जीवन असावं म्हणून त्यानं त्याला दिलं. २७आणि त्यानं त्याला न्याय करायचाही अधिकार दिला आहे, कारण तो मनुष्याचा पुत्र आहे. २८त्याचं आश्चर्य करू नका; कारण जेव्हा कबरांत असलेले सर्व त्याचा आवाज ऐकतील अशी घटका येत आहे. २९आणि चांगल्या गोष्टी करणारे जीवनाच्या पुनरुत्थानासाठी, आणि वाईट गोष्टी करणारे न्यायाच्या पुनरुत्थानासाठी बाहेर येतील.

[३०]"मी स्वतः आपल्याकडून काही करू शकत
नाही. मी जसं ऐकतो तसा न्याय करतो, आणि माझा
न्याय उचित आहे. कारण मी स्वतःची इच्छा पहात नाही,
पण ज्यानं मला धाडलं त्याची इच्छा पाहतो. [३१]मी जर
स्वतःविषयी साक्ष दिली तर माझी साक्ष खरी नाही;
[३२]माझ्याविषयी साक्ष देणारा दुसरा आहे; आणि मला
माहीत आहे की, माझ्याविषयी तो साक्ष देतो ती साक्ष खरी
आहे. [३३]तुम्ही लोकांना योहानाकडे पाठवलंत आणि त्यानं
सत्याविषयी साक्ष दिली. [३४]पण मी मनुष्याची साक्ष घेत
नाही, तरी तुमचं तारण व्हावं म्हणून मी हे सांगत आहे.
[३५]तो एक जळणारा आणि प्रकाशणारा दिवा होता; आणि
तुम्ही, काही काळ, त्याच्या प्रकाशात, हर्ष करायला तयार
होता. [३६]पण माझ्याजवळ जी साक्ष आहे ती योहानाच्या
साक्षीपेक्षा मोठी आहे, कारण मी जी कामं पूर्ण करावीत
म्हणून पित्यानं माझ्यावर सोपविली आहेत, ती जी कामं
मी करीत आहे ती माझ्याविषयी साक्ष देतात की, पित्यानं
मला पाठवलं आहे. [३७]आणि ज्या पित्यानं मला धाडलं
आहे त्यानंच माझ्याविषयी साक्ष दिली आहे. तुम्ही कधी
त्याचा आवाज ऐकलेला नाही, आणि त्याचं रूप पाहिलेलं
नाही; [३८]आणि त्याचं वचन तुमच्यात रहात नाही, कारण
त्यानं ज्याला पाठवलं आहे त्याच्यावर तुम्ही विश्वास
ठेवीत नाही. [३९]तुम्ही शास्त्रलेख शोधता, कारण तुम्ही
मानता की, त्यायोगे आपल्याला सनातन जीवन मिळेल.
आणि तेच माझ्याविषयी साक्ष देणारे आहेत. [४०]पण तुम्ही
आपल्याला जीवन मिळावं म्हणून माझ्याकडे येऊ इच्छीत
नाही. [४१]मी मनुष्याकडून मान मिळवीत नाही. [४२]पण मी
तुम्हाला ओळखतो की, तुमच्यात देवाविषयी प्रीती नाही.
[४३]मी माझ्या पित्याच्या नावानं आलो आहे, आणि तुम्ही
माझा स्वीकार करीत नाही; दुसरा स्वतःच्या नावानं आला
तर तुम्ही त्याचा स्वीकार कराल. [४४]जे तुम्ही
एकमेकांकडून मान मिळवता, आणि जो एकच देव आहे
त्याच्याकडचा मान मिळवू पहात नाही ते तुम्ही कसा
विश्वास ठेवू शकाल? [४५]मी पित्यासमोर तुमच्यावर
आरोप करीन, असं मानू नका. तुम्ही ज्याच्यावर भाव
ठेवता तो मोशेच तुमच्यावर आरोप करीत आहे; [४६]कारण
तुम्ही मोशेवर विश्वास ठेवला असता तर माझ्यावर
विश्वास ठेवला असता, कारण त्यानं माझ्याविषयी
लिहिलं आहे. [४७]पण तुम्ही त्याच्या लेखांवर विश्वास
ठेवीत नाही, तर माझ्या शब्दांवर कसा विश्वास ठेवाल?"

६ ह्यानंतर येशू गालील समुद्राच्या दुसऱ्या
बाजूस गेला (हा तिबिर्याचा समुद्र). [२]आणि
लोकांचा एक मोठा घोळका त्याच्या मागोमाग गेला;
कारण आजारी असलेल्यांवर तो जी चिन्हे करीत होता ती
ते पहात होते. [३]मग येशू एका डोंगरावर गेला, आणि तेथे
आपल्या शिष्यांबरोबर बसला. [४]आता वल्हांडण हा
यहुद्यांचा सण जवळ आला होता.

[५]येशूने डोळे वर केले आणि बघितले की, लोकांचा
एक जमाव आपल्याकडे येत आहे. तेव्हा तो फिलिपाला
म्हणतो,

"आपण ह्या लोकांना खायला भाकरी कुठून विकत
आणणार?"
[६]आणि त्याने हे त्याची परीक्षा करायला म्हटले. कारण तो
काय करणार होता हे तो स्वतः जाणत होता. [७]त्याला
फिलिपाने उत्तर दिले,

"त्यांच्यातल्या प्रत्येकाला थोडंसं देता यायला दोनशे
दिनार किंमतीच्या भाकरी पुरणार नाहीत."
[८]त्याच्या शिष्यांतला एक जण, शिमोन पेत्राचा भाऊ
अंद्रिया हा त्याला म्हणतो,

[९]"इथं एक लहान मुलगा आहे. त्याच्याजवळ पाच
जवाच्या भाकरी, आणि दोन मासळ्या आहेत; पण
इतक्या लोकांत त्या काय आहेत?"
[१०]येशू म्हणाला,

"लोकांना बसवा."
आता त्या जागी पुष्कळ गवत होते. तेव्हा ते बसले. ते
संख्येने सुमारे पाच हजार पुरुष होते. [११]तेव्हा येशूने त्या
पाच भाकरी घेतल्या, आणि त्याने उपकार मानल्यावर त्या
बसलेल्यांना वाटून दिल्या. तसेच त्या मासळ्यांतून त्यांना
हवे होते तितके दिले. [१२]आणि ते तृप्त झाल्यावर तो
आपल्या शिष्यांना म्हणतो,

"उरलेले तुकडे गोळा करा, म्हणजे कशाचा नाश
होऊ नये."
[१३]तेव्हा त्यांनी ते गोळा केले, आणि जेवणाऱ्यांना अधिक
झालेले त्या पाच जवाच्या भाकरींचे तुकडे बारा करंड्यांत
भरले. [१४]आणि त्या लोकांनी ते त्याने केलेले चिन्ह
बघितले तेव्हा ते म्हणाले,

"जगात येणार असलेला संदेष्टा खरोखर हा आहे."

१५म्हणून येशूने जेव्हा ओळखले की, ते आता
येतील, आणि आपल्याला राजा करायला बळाने नेतील,
तेव्हा तो पुन्हा एका डोंगरावर एकटा गेला.

१६**आणि संध्याकाळ झाल्यानंतर** त्याचे शिष्य
खाली समुद्राकडे गेले; १७आणि एका मचव्यात चढून
समुद्राच्या दुसऱ्या बाजूस कपर्णहूमकडे जाऊ लागले.
आता अंधार झाला होता, आणि येशू त्यांच्याकडे आला
नव्हता. १८आणि, मोठा वारा वहात असल्यामुळे समुद्र
खवळू लागला होता. १९मग त्यांनी सुमारे दोनतीन कोस
वल्हवल्यावर ते येशूला समुद्रावरून चालताना व
मचव्याकडे जवळ येताना पाहतात; आणि ते भ्याले.
२०पण तो त्यांना म्हणतो,

"मी आहे, भिऊ नका."

२१तेव्हा त्यांना बरे वाटून त्यांनी त्याला मचव्यात घेतले,
आणि लगेच, ते जात होते तिकडील किनाऱ्याला मचवा
आला.

२२**दुसऱ्या दिवशी** किनाऱ्याच्या दुसऱ्या बाजूस जे
लोक उभे होते त्यांनी हे बघितले की, त्याचे शिष्य ज्यात
चढले होते त्याशिवाय दुसरा एकही मचवा तेथे नव्हता व
त्या मचव्यात येशू त्याच्या शिष्यांबरोबर गेला नव्हता,
पण त्याचे शिष्य एकटे गेले होते. २३तरी प्रभूने उपकार
मानल्यावर त्यांनी जेथे भाकर खाल्ली त्या ठिकाणाजवळ
तिबिर्याहून दुसरे लहान मचवे आले होते. २४म्हणून, तेथे
येशू नव्हता व त्याचे शिष्यही नव्हते हे जेव्हा लोकांनी
बघितले तेव्हा त्यांनीही मचवे घेतले व येशूला शोधीत ते
कपर्णहूमला आले. २५आणि, तो त्यांना समुद्राच्या दुसऱ्या
बाजूस भेटला तेव्हा ते त्याला म्हणाले,

"रब्बी, आपण इकडे कधी आलात?"

२६येशूने त्यांना उत्तर देऊन म्हटले,

"मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो, तुम्ही चिन्हं
बघितलीत म्हणून नाही, पण त्या भाकरींतून खाल्लंत
आणि तृप्त झालात म्हणून मला शोधता. २७नष्ट होणाऱ्या
अन्नासाठी श्रम करू नका, पण सनातन जीवनाकरता,
टिकणाऱ्या अन्नासाठी श्रम करा. मनुष्याचा पुत्र ते तुम्हास
देईल, कारण त्याच्यावर देवपित्यानं शिक्का मारला
आहे."

२८तेव्हा ते त्याला म्हणाले,

"आम्ही देवाची कामं करावीत म्हणून काय करावं?"

२९येशूने त्यांना उत्तर देऊन म्हटले,

"देवाचं काम हे आहे की, त्यानं ज्याला पाठवलं
आहे त्याच्यावर तुम्ही विश्वास ठेवावा."

३०म्हणून ते त्याला म्हणाले,

"मग आपण कोणतं चिन्ह दाखवता की, ते बघून,
आम्ही आपल्यावर विश्वास ठेवावा? आपण कोणतं
करता? ३१आमच्या पूर्वजांनी अरण्यात मान्ना खाल्ला;
कारण 'त्याने त्यांना स्वर्गातील भाकर खायला दिली' असं
लिहिलेलं आहे."

३२तेव्हा येशू त्यांना म्हणाला,

"मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो, मोशेनं तुम्हाला
स्वर्गातील भाकर दिली नाही; पण माझा पिता तुम्हाला
स्वर्गातील खरी भाकर देतो. ३३कारण देवाची भाकर
स्वर्गातून उतरून जगाला जीवन देत आहे."

३४तेव्हा ते त्याला म्हणाले,

"महाराज, ह्यापुढं ही भाकर आम्हाला द्या."

३५तेव्हा येशू त्यांना म्हणाला,

"मी जीवनाची भाकर आहे. माझ्याकडे जो येतो
त्याला कधीही भूक लागणार नाही, आणि माझ्यावर
विश्वास ठेवतो त्याला कधीही तहान लागणार नाही.
३६पण मी तुम्हाला म्हटलं की, तुम्ही मला पाहिलंही आहे
आणि विश्वास ठेवीत नाही. ३७पिता मला जे सर्व देतो ते
माझ्याकडे येतील, आणि माझ्याकडे जो येतो त्याला मी
कधी घालवणार नाही. ३८कारण मी स्वर्गातून आलो तो
स्वतःच्या इच्छेप्रमाणं करायला नाही, पण ज्यानं मला
धाडलं त्याच्या इच्छेप्रमाणं करायला आलो आहे.
३९आणि ज्यानं मला धाडलं त्याची इच्छा ही आहे की,
त्यानं मला जे सर्व दिलं आहे त्यातून मी काही गमावू नये,
पण शेवटच्या दिवशी सर्व पुन्हा उठवावं. ४०माझ्या
पित्याची इच्छा ही आहे की, जो कोणी पुत्राला पाहतो
आणि त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याला सनातन जीवन
मिळावं; मी त्याला शेवटच्या दिवशी पुन्हा उठवीन."

४१तेव्हा यहुद्यांनी त्याच्याविरुद्ध कुरकुर केली, कारण
त्याने म्हटले, 'मी स्वर्गातून उतरलेली भाकर आहे'.
४२तेव्हा ते म्हणाले,

"हा येशू योसेफाचा मुलगा नाही काय? ह्याच्या
बापाला आणि आईला आम्ही ओळखतो. आता हा कसं
म्हणतो, 'मी स्वर्गातून उतरलो आहे' ?"

४३येशूने त्यांना उत्तर देऊन म्हटले,

"तुम्ही आपआपल्यात कुरकुर करू नका. [४४]ज्या पित्यानं मला धाडलं त्यानं कोणाला ओढल्याशिवाय तो माझ्याकडे येऊ शकत नाही. आणि, मी त्याला शेवटच्या दिवशी पुन्हा उठवीन. [४५]'आणि ते सगळे देवाने शिकवलेले होतील', असं संदेष्ट्यांत लिहिलं आहे, म्हणून जो पित्याकडून ऐकून शिकला आहे असा प्रत्येक मनुष्य माझ्याकडे येतो. [४६]जो देवापासून आहे त्यानं पित्याला पाहिलं आहे. त्याच्याशिवाय कोणी पित्याला पाहिलं आहे असं नाही. [४७]मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो, जो माझ्यावर विश्वास ठेवतो त्याला सनातन जीवन आहे. [४८]मीच जीवनाची भाकर आहे. [४९]तुमच्या पूर्वजांनी रानात मान्ना खाल्ला आणि ते मेले. [५०]पण स्वर्गातून उतरलेली भाकर अशी आहे की, कोणीही ती खावी आणि मरू नये. [५१]मी स्वर्गातून उतरलेली जिवंत भाकर आहे. ह्या भाकरीतून कोणी खाईल तर तो सर्वकाळ जिवंत राहील. आणि, जगाच्या जीवनासाठी मी जी भाकर देईन ती माझा देह आहे."

[५२]तेव्हा यहुद्यांनी आपआपल्यात वाद लढवून म्हटले,

"हा आम्हाला आपला देह कसा खायला देऊ शकेल?"

[५३]ह्यावरून येशू त्यांना म्हणाला,

"मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो, तुम्ही जोवर मनुष्याच्या पुत्राचा देह खात नाही, आणि त्याचं रक्त पीत नाही तोवर तुम्हाला तुमच्यात जीवन नाही. [५४]जो माझा देह खातो आणि माझं रक्त पितो त्याला सनातन जीवन आहे. आणि मी त्याला शेवटच्या दिवशी पुन्हा उठवीन. [५५]कारण, खरोखर, माझा देह अन्न आहे, आणि, खरोखर, माझं रक्त पेय आहे. [५६]जो माझा देह खातो आणि माझं रक्त पितो तो माझ्यात राहतो आणि मी त्याच्यात राहतो. [५७]जिवंत पित्यानं जसं मला पाठवलं, आणि मी जसा पित्यामुळं जगतो तसा जो मला खातो तोही माझ्यामुळं जगेल. [५८]हीच स्वर्गातून उतरलेली भाकर आहे. जी पूर्वजांनी खाल्ली आणि ते मेले तशी ही नाही. जो कोणी ह्या भाकरीतून खातो तो सर्वकाळ जगेल."

[५९]तो कपर्णहूम येथे शिकवीत असताना सभास्थानात ह्या गोष्टी बोलला. [६०]म्हणून त्याच्या शिष्यांतल्या पुष्कळांनी हे ऐकून म्हटले,

"हे वचन कठिण आहे; हे कोणाला ऐकवेल?"

[६१]पण येशूने अंतरी ओळखले की, आपले शिष्य ह्याविषयी कुरकुर करीत आहेत; तेव्हा तो त्यांना म्हणाला,

"ह्याचा तुम्हाला अडथळा होतो काय? [६२]आणि तुम्ही जर मनुष्याच्या पुत्राला तो आधी होता तिथं वर जाताना पहाल तर? [६३]आत्मा जीवन देणारा आहे, देह काही लाभ घडवीत नाही. मी तुमच्याशी बोललो ती वचनं आत्मा आणि जीवन आहेत. [६४]पण तुमच्यात असे काही आहेत की, ते विश्वास ठेवीत नाहीत."

कारण, कोण विश्वास ठेवीत नाही, आणि आपल्याला कोण धरून देईल, हे येशू प्रारंभापासून जाणत होता. [६५]आणि तो म्हणाला,

"म्हणून मी तुम्हांला म्हटलं की, कोणीही मनुष्य, त्याला पित्यानं ते दिलं असल्याशिवाय, माझ्याकडे येऊ शकत नाही."

[६६]त्यानंतर, त्याच्या शिष्यांतले पुष्कळ जण परत गेले, आणि ते पुन्हा कधी त्याच्याबरोबर चालले नाहीत.

[६७]तेव्हा येशू बारा जणांना म्हणाला,

"तुमचीपण जायची इच्छा आहे काय?"

[६८]तेव्हा शिमोन पेत्राने त्याला उत्तर दिले,

"प्रभू, आम्ही कोणाकडे जाणार? तुझ्याजवळ सनातन जीवनाची वचनं आहेत. [६९]आणि आम्ही विश्वास ठेवतो, आणि जाणतो की, तू देवाचा पवित्र आहेस."

[७०]येशूने त्यांना उत्तर दिले,

"मी तुम्हा बारा जणांना निवडलं ना? आणि तुमच्यात एक जण सैतान आहे."

[७१]हे त्याने शिमोनाचा पुत्र यहुदा इस्कार्योत ह्याच्याविषयी म्हटले होते; कारण बारा जणांतला तो एक असून त्याला धरून देणार होता.

७ ह्यानंतर येशू गालिलात फिरला, कारण यहुदियात फिरायची त्याची इच्छा नव्हती; कारण यहुदी त्याला ठार मारायला टपले होते. [२]आता यहुद्यांचा मंडपाचा सण जवळ आला होता. [३]तेव्हा त्याचे भाऊ त्याला म्हणाले,

"तू इथून नीघ, आणि यहुदियात जा, म्हणजे तू करतोस ती तुझी कामं तुझ्या शिष्यांनीही पहावीत. [४]कारण कोणाही मनुष्य काही गुप्तात करून स्वतः उघडपणे प्रसिद्ध होऊ पहात नाही; तू ह्या गोष्टी करीत असशील तर स्वतः जगाला प्रगट हो."

५कारण त्याचे भाऊही त्याच्यावर विश्वास ठेवीत नव्हते.
६तेव्हा येशू त्यांना म्हणाला,
"माझी वेळ अजून आलेली नाही; तुमची वेळ सतत
तयार आहे. ७जग तुमचा द्वेष करू शकणार नाही; ते माझा
द्वेष करते; कारण मी त्याच्याविषयी साक्ष देतो की, त्याची
कामं वाईट आहेत. ८तुम्ही ह्या सणाला वर जा. मी ह्या
सणाला आताच वर जात नाही. कारण माझा काळ अजून
पूर्ण झाला नाही."
९तो हे शब्द त्यांना बोलल्यावर गालिलात राहिला.
१०पण त्याचे भाऊ वर गेल्यावर तोही सणाला वर
गेला; पण उघडपणे नाही, तर जणू गुप्तपणे गेला. ११तेव्हा,
यहुदी त्याला सणात शोधीत होते आणि म्हणत होते,
"तो कुठं आहे?"
१२आणि लोकांत त्याच्याविषयी पुष्कळ कुजबुज होत
होती. कोणी म्हणत,
"तो चांगला आहे."
दुसरे कोणी म्हणत,
"नाही; पण तो लोकांना फसवतो."
१३पण यहुद्यांच्या भयाने कोणीही त्याच्याविषयी उघडपणे
बोलत नसे.
१४पण सण अर्ध्यावर आला तेव्हा येशू वर मंदिरात
जाऊन शिकवू लागला. १५तेव्हा यहुद्यांनी आश्चर्य केले व
म्हटले,
"हा मनुष्य शिकलेला नसता हा लेख कसे जाणतो?"
१६म्हणून येशूने त्यांना उत्तर देऊन म्हटले,
"माझं शिक्षण माझं नाही, पण ज्यानं मला धाडलं
त्याचं आहे. १७कोणी त्याच्या इच्छेप्रमाणं करू इच्छील
तर त्याला कळेल की, हे शिक्षण त्याचं आहे किंवा मी
स्वतःचं सांगतो. १८जो स्वतःचं सांगतो तो आपलं स्वतःचं
गौरव पाहतो; पण जो आपल्याला ज्यानं धाडलं त्याचं
गौरव पाहतो तो मनुष्य खरा आहे; आणि त्याच्यात काही
अनीती नाही. १९मोशेनं तुम्हाला नियमशास्त्र दिलं आहे
ना? आणि तुमच्यातला कोणीही नियमशास्त्र पाळीत नाही.
तुम्ही मला ठार मारायला का टपता?"
२०लोकांनी त्याला उत्तर देऊन म्हटले,
"तुझ्यात भूत आहे. कोण तुला ठार मारायला टपतो
आहे?"
२१येशूने त्यांना उत्तर देऊन म्हटले,
"मी एक काम केलं, आणि तुम्ही सगळे आश्चर्य
करता. २२मोशेनं ह्याकरता, तुम्हाला सुनत लावून दिली.
तरी ती मोशेपासून नाही, पण पूर्वजांपासून आहे. आणि
तुम्ही शब्बाथ दिवशी मनुष्याची सुनत करता. २३मोशेचं
नियमशास्त्र मोडू नये म्हणून जर शब्बाथ दिवशी मनुष्याला
सुनत मिळते, तर मी शब्बाथ दिवशी एका मनुष्याला
सर्वांगी निरोगी केलं म्हणून तुम्ही माझ्यावर रागावता
काय? २४दिसतं त्यावरून न्याय करू नका, पण उचित
न्यायानं न्याय करा."
२५तेव्हा यरुशलेमच्या लोकांतले कित्येक म्हणाले,
"ज्याला ठार मारायला टपलेत तो हाच आहे ना?
२६पण बघा, तो उघडपणे बोलत आहे, आणि ते त्याला
काहीच बोलत नाहीत. हाच ख्रिस्त आहे, हे खरोखर
अधिकाऱ्यांना कळलं आहे काय? २७तरी हा मनुष्य
कुठला आहे हे आम्ही जाणतो; पण ख्रिस्त आल्यावर तो
कुठून आला हे कोणाला कळणार नाही."
२८म्हणून येशू मंदिरात शिकवीत असता ओरडून
म्हणाला,
"तुम्ही मला ओळखता आणि मी कुठला आहे हे
तुम्ही जाणता; तरी मी स्वतः आलो नाही; पण, ज्यानं
मला धाडलं तो खरा आहे. आणि तुम्ही त्याला ओळखीत
नाही. २९पण मी त्याला ओळखतो, कारण मी
त्याच्याकडून आहे आणि त्यानं मला पाठवलं आहे."
३०म्हणून ते त्याला धरायला टपले; पण कोणी
त्याच्यावर हात टाकले नाहीत, कारण त्याची घटका
अजून आलेली नव्हती. ३१तेव्हा लोकांतल्या पुष्कळांनी
त्याच्यावर विश्वास ठेवला व ते म्हणाले,
"ख्रिस्त येईल तेव्हा ह्यानं केलेल्या चिन्हांपेक्षा तो
काही अधिक करील काय?"
३२लोक त्याच्याविषयी अशा गोष्टी कुजबुजतात हे
परोश्यांनी ऐकले, तेव्हा परोश्यांनी आणि वरिष्ठ याजकांनी
त्याला धरायला कामदारांना धाडले.
३३म्हणून येशू म्हणाला,
"मी आणखी अल्पकाळ तुमच्याबरोबर आहे. आणि
ज्यानं मला धाडलं त्याच्याकडे मी निघून जाईन. ३४तुम्ही
माझा शोध कराल, पण मी तुम्हाला सापडणार नाही;
आणि मी असेन तिकडे तुम्हाला येता येणार नाही."
३५तेव्हा यहुदी आपआपल्यात म्हणाले,
"हा आपल्याला सापडणार नाही असा हा कुठं
जाईल? हा हेल्लेण्यांत पांगलेल्या लोकांत जाऊन
हेल्लेण्यांना शिकवील काय? ३६हा जे म्हणतो की, 'तुम्ही
माझा शोध कराल आणि मी तुम्हाला सापडणार नाही',

आणि 'मी असेन तिकडे तुम्हाला येता येणार नाही', हे म्हणणं काय आहे?"

[३७]मग शेवटच्या दिवशी, त्या सणातल्या मोठ्या दिवशी, येशू उभा राहून ओरडून म्हणाला,

"कोणाला तहान लागली असेल तर त्यानं माझ्याकडे येऊन प्यावं. [३८]जो माझ्यावर विश्वास ठेवतो त्याच्या पोटातून, शास्त्रलेखात म्हटल्याप्रमाणं जिवंत पाण्याच्या नद्या वाहतील."

[३९]पण ज्यांनी त्याच्यावर विश्वास ठेवला त्यांना जो आत्मा मिळणार होता त्याच्याविषयी तो हे बोलला. कारण अजून पवित्र आत्मा दिलेला नव्हता, कारण अजून येशूचे गौरव झाले नव्हते.

[४०]म्हणून लोकांनी हे वचन ऐकले तेव्हा त्यांच्यातले पुष्कळ जण म्हणाले,

"खरोखर, हा तो संदेष्टा आहे."

[४१]दुसरे म्हणाले,

"हा ख्रिस्त आहे."

पण काही म्हणाले,

"ख्रिस्त गालिलातून येणार आहे काय? [४२]दाविदाच्या संतानातून आणि ज्या गावात दावीद होता त्या बेथलेहेमातून ख्रिस्त येईल असं शास्त्रलेख म्हणत नाही काय?"

[४३]ह्यामुळे त्याच्यावरून लोकांत फूट झाली. [४४]आणि त्यांच्यातल्या काही जणांची त्याला धरायची इच्छा होती, पण कोणी त्याच्यावर हात टाकले नाहीत.

[४५]म्हणून कामदार वरिष्ठ याजकांकडे व परोश्यांकडे आले तेव्हा ते त्यांना म्हणाले,

"तुम्ही त्याला का आणलं नाही?"

[४६]कामदारांनी उत्तर दिले,

"हा मनुष्य बोलतो तसा कोणी कधी बोलला नाही."

[४७]तेव्हा परोश्यांनी त्यांना उत्तर दिले,

"तुम्ही पण फसलात काय? [४८]अधिकाऱ्यांपैकी किंवा परोश्यांपैकी कोणी त्याच्यावर विश्वास ठेवला आहे काय? [४९]पण नियमशास्त्र न जाणणारे हे लोक शापित आहेत."

[५०](पूर्वी त्याच्याकडे आलेला, आणि त्यांच्यातला एक असलेला) निकदेम त्यांना म्हणतो,

[५१]"एखाद्या मनुष्याचं ऐकण्याअगोदर, आणि तो काय करतो हे कळण्याअगोदर आपलं नियमशास्त्र त्याचा न्याय करतं काय?"

[५२]त्यांनी त्याला उत्तर देऊन म्हटले,

"तुम्हीपण गालिलातले आहात काय? शोधा आणि बघा, कारण गालिलातून संदेष्टा उद्भवत नाही."

[[५३]आणि प्रत्येक जण आपआपल्या घरी गेला.

८ पण येशू जैतूनांच्या डोंगरावर गेला, [२]आणि, पुन्हा पहाटेस मंदिरात आला; तेव्हा सर्व लोक त्याच्याकडे आले, आणि, तो खाली बसून त्यांना शिकवू लागला. [३]तेव्हा, व्यभिचार करण्यात धरलेल्या एका बाईला शास्त्री व परोशी त्याच्याकडे आणतात, आणि तिला मध्यभागी उभी करून ते त्याला म्हणतात,

[४]"गुरू, ही बाई व्यभिचारकर्मात धरली गेली. [५]आता अशांना दगडमार करावा, म्हणून मोशेनं नियमशास्त्रात आम्हाला आज्ञा दिली आहे. पण आपण काय म्हणता?"

[६]आपल्याला त्याच्यावर काही आरोप करायला मिळावे म्हणून त्यांनी हे त्याची परीक्षा करायला म्हटले. पण येशू खाली वाकला व आपल्या बोटाने जमिनीवर लिहू लागला. [७]पण ते जेव्हा त्याला विचारीत राहिले तेव्हा तो सरळ बसला व त्यांना म्हणाला,

"तुमच्यात जो कोणी निष्पाप असेल त्यानं प्रथम तिच्यावर एक दगड टाकावा."

[८]आणि तो पुन्हा खाली वाकला व आपल्या बोटाने जमिनीवर लिहू लागला.

[९]पण त्यांनी हे ऐकले तेव्हा सर्वांत वडील माणसापासून प्रारंभ होऊन, ते एकामागून एक निघून गेले; आणि, येशू एकटा राहिला व ती बाई मध्यभागी उभी होती. [१०]तेव्हा येशू सरळ बसला व तिला म्हणाला,

"बाई, तुला कुणी दोषी ठरवलं नाही काय?"

[११]ती म्हणाली,

"कुणी नाही, प्रभू."

आणि येशू म्हणाला,

"मीपण तुला दोषी ठरवीत नाही; जा, ह्यापुढं पाप करू नको."]

[१२]म्हणून पुन्हा, येशू त्यांच्याबरोबर बोलू लागला आणि म्हणाला,

"मी जगाचा प्रकाश आहे; जो माझ्यामागं येतो तो अंधारात चालणार नाही, पण त्याच्याजवळ जीवनाचा प्रकाश राहील."

१३म्हणून परोशी त्याला म्हणाले,
"तू स्वतःविषयी साक्ष देतोस; तुझी साक्ष खरी नाही."
१४येशूने त्यांना उत्तर देऊन म्हटले,
"मी स्वतःविषयी साक्ष दिली तरी माझी साक्ष खरी
आहे, कारण मी कुठून आलो आणि कुठं जाणार हे मला
माहीत आहे; पण मी कुठून आलो आणि कुठं जाणार हे
तुम्हाला माहीत नाही. १५तुम्ही देहानुसार न्याय करता; मी
कुणाचा न्याय करीत नाही. १६आणि तरी मी न्याय करतो,
तर माझा न्याय खरा आहे. कारण मी एकटा नाही, पण मी
आणि मला धाडणारा, असे आम्ही आहो. १७तुमच्या
नियमशास्त्रातपण लिहिलं आहे की, दोघांची साक्ष खरी
असते. १८माझ्याविषयी साक्ष देणारा मी एक आहे, आणि
मला धाडणारा पिता माझ्याविषयी साक्ष देतो."
१९तेव्हा ते त्याला म्हणाले,
"तुझा पिता कुठं आहे?"
येशूने उत्तर दिले,
"तुम्ही मला किंवा माझ्या पित्यालाही ओळखीत
नाही. तुम्ही मला ओळखलं असतं तर माझ्या पित्यालाही
ओळखलं असतं."
२०तो मंदिरात शिकवीत असता भांडारासमोर ही
वचने बोलला; पण कोणीही त्याच्यावर हात टाकले
नाहीत, कारण त्याची घटका अजून आलेली नव्हती.
२१म्हणून पुन्हा तो त्यांना म्हणाला,
"मी निघून जाईन, आणि तुम्ही माझा शोध कराल,
आणि तुमच्या पापात मराल; मी जाईन तिकडे तुम्हाला
येता येणार नाही."
२२तेव्हा यहुदी म्हणाले,
"हा आत्महत्या करणार काय? कारण हा म्हणतो
की, 'मी जाईन तिकडे तुम्हाला येता येणार नाही'."
२३आणि तो त्यांना म्हणाला,
"तुम्ही खालचे आहा, मी वरचा आहे; तुम्ही ह्या
जगाचे आहा, मी ह्या जगाचा नाही. २४म्हणून मी तुम्हाला
म्हटलं, तुम्ही तुमच्या पापांत मराल; कारण, मी तो आहे
असा तुम्ही विश्वास ठेवला नाही, तर तुम्ही तुमच्या
पापांत मराल."
२५तेव्हा ते त्याला म्हणाले,
"तू कोण आहेस?"
आणि येशू त्यांना म्हणाला,
"मी तुम्हाला तेच प्रारंभापासून सांगतो.
२६तुमच्याविषयी बोलायला आणि न्याय करायला पुष्कळ
गोष्टी माझ्याजवळ आहेत; पण ज्यानं मला धाडलं तो खरा
आहे आणि मी त्याच्याकडून ऐकलेल्या गोष्टी जगाला
सांगतो."
२७तो त्यांच्याशी पित्याविषयी बोलत होता हे त्यांना
कळले नाही.
२८तेव्हा येशू त्यांना म्हणाला,
"तुम्ही जेव्हा मनुष्याच्या पुत्राला वर चढवाल तेव्हा
तुम्हाला हे कळेल की, मी तो आहे, आणि मी स्वतः काही
करीत नाही; पण पित्यानं मला सांगितल्याप्रमाणं मी हे
करतो. २९आणि मला ज्यानं धाडलं तो माझ्याबरोबर
आहे; त्यानं मला एकटं सोडलं नाही; कारण मी नेहमी
त्याला आवडणाऱ्या गोष्टी करतो."
३०तो हे बोलत असता पुष्कळ जणांनी त्याच्यावर
विश्वास ठेवला.

३१तेव्हा ज्या यहुद्यांनी त्याच्यावर विश्वास ठेवला
होता त्यांना येशू म्हणाला,
"तुम्ही माझ्या वचनात राहिला तर खरोखर माझे
शिष्य आहा. ३२तुम्हाला सत्य समजेल, आणि सत्य
तुम्हाला स्वतंत्र करील."
३३त्यांनी त्याला उत्तर दिले,
"आम्ही अब्राहामाचे संतान आहो, आणि कधी
कोणाचे दास झालो नाही. तू आम्हाला कसा म्हणतोस
की, तुम्ही स्वतंत्र केले जाल?"
३४येशूने त्यांना उत्तर दिले,
"मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो, जो कोणी पाप
करतो तो पापाचा दास आहे. ३५दास सदैव घरात रहात
नाही; पुत्र सदैव घरात राहतो. ३६म्हणून जर पुत्रानं तुम्हाला
स्वतंत्र केलं तर तुम्ही, खरोखर, स्वतंत्र व्हाल. ३७मी
जाणतो की, तुम्ही अब्राहामाचे वंशज आहा, पण मला
ठार मारायला टपला आहा; कारण माझ्या वचनाला
तुमच्यात वाव मिळत नाही. ३८मी माझ्या पित्याजवळ
पाहिलं ते बोलतो, आणि तुम्ही तुमच्या पित्याकडून ऐकलं
ते करता."
३९त्यांनी त्याला उत्तर देऊन म्हटले,
"अब्राहाम आमचा पिता आहे."
येशू त्यांना म्हणतो,
"तुम्ही अब्राहामाची मुलं आहा तर अब्राहामाच्या
कृती करा. ४०पण मी जे सत्य देवाकडून ऐकलं, ते
तुम्हाला सांगणाऱ्या मला तुम्ही ठार मारायला पाहता. हे

अब्राहामानं केलं नाही. [४१]तुम्ही तुमच्या पित्याच्या कृती
करता."
ते त्याला म्हणाले,
"आम्ही जारकर्मानं जन्मलो नाही, आम्हाला एक
पिता आहे. तो देव आहे."
[४२]येशू त्यांना म्हणाला,
"देव तुमचा पिता असता तर तुम्ही माझ्यावर प्रीती
केली असती; कारण मी देवापासून निघालो आणि आलो,
आणि स्वतः होऊन आलो नाही, पण त्यानं मला पाठवलं.
[४३]माझं बोलणं तुम्हांला का कळत नाही? कारण तुम्हाला
माझं वचन ऐकवत नाही. [४४]तुम्ही ज्याचे आहात तो सैतान
तुमचा पिता आहे, आणि तुमच्या पित्याच्या वासनांप्रमाणं
करावं ही तुमची इच्छा आहे. तो प्रारंभापासून खुनी आहे.
तो सत्यात राहिला नाही, कारण त्याच्यात सत्य नव्हतं. तो
जेव्हा असत्य सांगतो तेव्हा तो स्वतःचं सांगतो कारण तो
लबाड आहे आणि असत्याचा जनक आहे. [४५]आणि, मी
सत्य सांगतो म्हणून तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवीत नाही.
[४६]तुमच्यातला कोण मला पापाचा दोष लावील? आणि
मी जर सत्य सांगतो तर तुम्ही माझ्यावर का विश्वास
ठेवीत नाही? [४७]जो देवाकडचा आहे तो देवाची वचनं
ऐकतो. म्हणून तुम्ही ऐकत नाही, कारण तुम्ही देवाकडचे
नाही."
[४८]तेव्हा यहुद्यांनी त्याला उत्तर देऊन म्हटले,
"तू शोमरोनी आहेस, आणि तुझ्यात भूत आहे, हे
आम्ही बरोबर म्हणतो ना?"
[४९]येशूने त्यांना उत्तर दिले,
"माझ्यात भूत नाही; पण मी माझ्या पित्याला मान
देतो आणि तुम्ही माझा अपमान करता. [५०]पण मी माझं
स्वतःचं गौरव पहात नाही; जो ते पाहतो आणि न्याय
करतो असा एक आहे. [५१]मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो,
कोणी माझी वचनं पाळील तर तो कधीच मरण पाहणार
नाही."
[५२]तेव्हा यहुदी त्याला म्हणाले,
"आता आम्हाला कळलं की, तुझ्यात भूत आहे.
अब्राहाम मेला आणि संदेष्टे मेले; आणि तू म्हणतोस की,
'कोणी माझं वचन पाळील तर तो कधी मरण अनुभवणार
नाही'. [५३]आमचा पिता अब्राहाम मेला; त्याच्यापेक्षा तू
मोठा आहेस काय? आणि संदेष्टे मेले; तू स्वतःला काय
बनवतोस?"
[५४]येशूने उत्तर दिले,
"मी स्वतःचं गौरव केलं तर माझं गौरव काही नाही,
पण जो तुमचा देव आहे असं ज्याच्याविषयी तुम्ही
म्हणता तो माझा पिता माझं गौरव करतो. [५५]तरी, तुम्ही
त्याला जाणलेलं नाही, पण मी त्याला ओळखतो. आणि
मी जर म्हटलं की, मी त्याला ओळखीत नाही, तर मी
तुमच्यासारखा लबाड होईन. पण, मी त्याला ओळखतो,
आणि त्याचं वचन पाळतो. [५६]माझा दिवस बघायला
तुमचा पिता अब्राहाम उल्लासला; त्यानं तो बघितला
आणि तो आनंदित झाला."
[५७]म्हणून यहुदी त्याला म्हणाले,
"तू अजून पन्नास वर्षांचा नाहीस आणि अब्राहामाला
पाहिलंस काय?"
[५८]येशू त्यांना म्हणाला,
"मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो, अब्राहाम
झाल्याअगोदर मी आहे."
[५९]तेव्हा त्यांनी त्याच्यावर टाकायला दगड उचलले,
पण येशू दडला आणि मंदिरामधून बाहेर गेला.

**९** आणि तो पुढे जात असता त्याने एका
जन्मांध मनुष्याला बघितले. [२]आणि त्याचे शिष्य
त्याला प्रश्न करून म्हणाले,
"रब्बी, कोणी पाप केलं? ह्यानं, किंवा ह्याच्या
आईबापांनी, म्हणून हा अंधळा जन्मला?"
[३]येशूने उत्तर दिले,
"ह्यानं, किंवा ह्याच्या आईबापांनी पाप केलं असं
नाही, पण देवाची कामं ह्याच्यात प्रगट व्हावीत म्हणून
असं झालं. [४]ज्यानं मला धाडलं त्याची कामं आपण
दिवस असेपर्यंत केली पाहिजेत. रात्र येते तेव्हा कोणीही
काम करू शकत नाही. [५]मी जगात आहे तोवर मी जगाचा
प्रकाश आहे."
[६]तो एवढे बोलल्यावर त्याने जमिनीवर थुंकी टाकली
व थुंकीने ओली माती करून ती ओली माती त्याच्या
डोळ्यांवर लावली. [७]आणि त्याला म्हटले,
"जा, शिलोहाच्या तळ्यात धू."
(ह्याचा अर्थ पाठवलेले) म्हणून त्याने जाऊन धुतले आणि
तो पहात आला.
[८]म्हणून त्याचे शेजारी व ज्यांनी त्याला भीक
मागताना पूर्वी पाहिले होते ते म्हणाले,
"तो जो बसून भीक मागत असे तो हाच ना?"
[९]कोणी म्हणाले,

"हा तो आहे."

दुसरे म्हणाले,

"नाही, पण हा त्याच्यासारखा आहे."

पण तो म्हणाला,

"मी तो आहे."

[१०]म्हणून ते त्याला म्हणाले,

"मग तुझे डोळे कसे उघडले?"

[११]त्याने उत्तर दिले,

"ज्या मनुष्याला येशू म्हणतात त्यानं ओली माती करून ती माझ्या डोळ्यांना लावली आणि तो मला म्हणाला, 'शिलोहावर जा आणि धू'. मी जाऊन धुतले, आणि मला दृष्टी आली."

[१२]आणि ते त्याला म्हणाले,

"तो कुठं आहे?"

तो म्हणतो,

"मला माहीत नाही."

[१३]तो जो पूर्वी अंधळा होता त्याला ते परोश्यांकडे आणतात, [१४]आता, येशूने ओली माती करून जेव्हा त्याचे डोळे उघडले त्या दिवशी शब्बाथ होता. [१५]तेव्हा त्याला दृष्टी कशी आली हे पुन्हा परोश्यांनीही त्याला विचारले. आणि तो त्यांना म्हणाला,

"त्यानं माझ्या डोळ्यांवर ओली माती लावली, आणि मी धुतली, आणि मला दिसतं."

[१६]तेव्हा परोश्यांतले काही जण म्हणाले,

"हा देवाकडून नाही, कारण हा शब्बाथ पाळीत नाही."

पण दुसरे म्हणाले,

"जो मनुष्य पापी आहे तो असली चिन्हं कशी करू शकेल?"

[१७]म्हणून, पुन्हा ते त्या अंधळ्याला म्हणतात,

"त्यानं जर तुझे डोळे उघडले तर तू त्याच्याविषयी काय म्हणतोस?"

तो म्हणाला,

"तो एक संदेष्टा आहे."

[१८]म्हणून यहुद्यांनी ज्याला दृष्टी आली होती त्याच्या बाबतीत, त्याच्या आईबापांना बोलवीपर्यंत, तो अंधळा होता व त्याला दृष्टी आली होती ह्यावर विश्वास ठेवला नाही. [१९]आणि त्यांनी त्यांना प्रश्न करून म्हटले,

"तुमचा जो मुलगा अंधळा जन्मला म्हणून तुम्ही म्हणता तो हा आहे काय? मग आता त्याला कसं दिसतं?"

[२०]त्याच्या आईबापांनी उत्तर देऊन म्हटले,

"हा आमचा मुलगा आहे; आणि हा अंधळा जन्मला होता हे आम्हाला माहीत आहे. [२१]पण आता त्याला कशामुळं दिसतं हे आम्हाला माहीत नाही, किंवा कोणी त्याचे डोळे उघडले हेही आम्हाला माहीत नाही. तो मोठ्या वयाचा आहे, त्याला विचारा; तो स्वतःविषयी सांगेल."

[२२]त्याच्या आईबापांनी असे उत्तर दिले, कारण ते त्यांना भीत होते; कारण, तो ख्रिस्त आहे असे कोणी पतकरल्यास त्याला सभास्थानबहिष्कृत करावे, हे यहुद्यांनी आधीच ठरवले होते. [२३]म्हणून त्याच्या आईबापांनी म्हटले, 'तो मोठ्या वयाचा आहे, त्याला विचारा.'

[२४]तेव्हा जो मनुष्य अंधळा होता त्याला त्यांनी दुसऱ्यांदा बोलावले आणि ते त्याला म्हणाले,

"देवाला गौरव दे; हा मनुष्य पापी आहे हे आम्ही जाणतो."

[२५]म्हणून त्याने उत्तर दिले,

"तो पापी आहे काय, हे मी जाणत नाही. मी एक गोष्ट जाणतो; मी अंधळा होतो आणि आता मला दिसतं."

[२६]म्हणून ते त्याला म्हणाले,

"त्यानं तुला काय केलं? त्यानं तुझे डोळे कसे उघडले?"

[२७]त्याने त्यांना उत्तर दिले,

"मी तुम्हाला आताच सांगितलं, आणि तुम्ही ऐकलं नाही; ते कशाला पुन्हा ऐकायची तुमची इच्छा आहे? त्याचे शिष्य व्हायची तुमची इच्छा आहे काय?"

[२८]तेव्हा त्यांनी त्याची हेटाळणी केली, आणि ते त्याला म्हणाले,

"तू त्याचा शिष्य आहेस; आम्ही मोशेचे शिष्य आहोत. [२९]देव मोशेबरोबर बोलला हे आम्हाला माहीत आहे. ह्याच्याविषयी हा कुठला आहे हे आम्हाला माहीत नाही."

[३०]तो मनुष्य त्यांना उत्तर देऊन म्हणतो,

"तर ह्यात आश्चर्यकारक हे आहे की, हा कुठला आहे हे तुम्हाला माहीत नाही; आणि तरी त्यानं माझे डोळे उघडले. [३१]आपल्याला हे माहीत आहे की, देव पाप्यांचं

ऐकत नाही, पण जो मनुष्य देवभक्त आहे आणि जो
त्याच्या इच्छेप्रमाणं करतो त्याचं तो ऐकतो. [३२]कोणी
मनुष्यानं अंधळा जन्मलेल्या कोणाचे डोळे उघडले हे
युगादीपासून ऐकलेलं नाही. [३३]हा जर देवाकडून नसता तर
काही करू शकला नसता."
[३४]त्यांनी त्याला उत्तर देऊन म्हटले,
"तू सर्वस्वी पापात जन्मलास, आणि तू आम्हाला
शिकवतोस काय?"
आणि त्यांनी त्याला बाहेर काढले.
[३५]त्यांनी त्याला बाहेर काढले होते हे येशूने ऐकले;
आणि त्याला तो सापडल्यावर तो त्याला म्हणाला,
"तू मनुष्याच्या पुत्रावर विश्वास ठेवतोस काय?"
[३६]त्याने उत्तर देऊन म्हटले,
"आणि, प्रभू, तो कोण आहे की, मी त्याच्यावर
विश्वास ठेवू?"
[३७]येशू त्याला म्हणाला,
"तू त्याला पहात आहेस आणि तोच तुझ्याशी बोलत
आहे."
[३८]तो म्हणाला,
"प्रभू, मी विश्वास ठेवतो."
आणि त्याने त्याला नमन केले.

[३९]आणि येशू म्हणाला,
"मी ह्या जगात ह्या न्यायनिवाड्यासाठी आलो;
म्हणजे ज्यांना दिसत नाही त्यांना दिसावं, आणि ज्यांना
दिसतं त्यांनी अंधळे व्हावं."
[४०]तेव्हा परोश्यांतले जे त्याच्याबरोबर होते त्यांनी ह्या गोष्टी
ऐकल्या; आणि ते त्याला म्हणाले,
"आम्ही पण अंधळे आहोत काय?"
[४१]येशू त्यांना म्हणाला,
"तुम्ही जर अंधळे असता तर तुमच्याकडे पाप नसतं,
पण आता तुम्ही म्हणता की, 'आम्हाला दिसतं', म्हणून
तुमचं पाप राहतं.

१० "मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो, जो
दारातून मेंढवाड्यात जात नाही, पण दुसरीकडे
चढतो, तो चोर आणि लुटारू आहे. [२]पण, जो दारातून
आत जातो तो मेंढरांचा मेंढपाळ आहे. [३]द्वारपाल
त्याच्यासाठी दार उघडतो आणि मेंढरं त्याचा आवाज
ऐकतात. तो आपल्या मेंढरांना नावानं बोलावतो आणि
त्यांना बाहेर आणतो; [४]आणि आपली सगळी बाहेर
काढतो तेव्हा तो त्यांच्या पुढं जातो, आणि मेंढरं
त्याच्यामागं जातात; कारण ती त्याचा आवाज
ओळखतात. [५]आणि ती परक्याच्या मागं जाणार नाहीत,
पण ती त्याच्यापासून पळतील; कारण ती परक्यांचा
आवाज ओळखीत नाहीत."
[६]येशूने त्यांना हा दाखला सांगितला पण तो
त्यांच्याशी कोणत्या गोष्टींविषयी बोलत होता हे त्यांना
कळले नाही. [७]तेव्हा येशू पुन्हा त्यांना म्हणाला,
"मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो, मी मेंढरांचं दार
आहे. [८]माझ्या आधी जे कोणी आले ते सगळे चोर आणि
लुटारू आहेत, पण मेंढरांनी त्यांचं ऐकलं नाही. [९]मी दार
आहे; माझ्यामधून जर कोणी आत येईल तर त्याचं तारण
होईल; तो आत येईल आणि बाहेर जाईल, आणि त्याला
अन्न मिळेल. [१०]चोर, नाहीतरी, चोरायला, ठार मारायला
आणि नष्ट करायला येतो. मी त्यांना जीवन मिळावं, आणि
विपुलपणे मिळावं म्हणून आलो. [११]मी चांगला मेंढपाळ
आहे; चांगला मेंढपाळ मेंढरांसाठी स्वतःचा जीव देईल.
[१२]जो मोलकरी आहे आणि मेंढपाळ नाही, ज्याची
स्वतःची मेंढरं नाहीत, तो लांडगा येत आहे हे पाहतो तेव्हा
मेंढरं सोडतो आणि पळून जातो; आणि लांडगा येऊन
त्यांना धरतो आणि पांगवतो. [१३]मोलकरी पळतो कारण तो
मोलकरी आहे, आणि मेंढरांची पर्वा करीत नाही. [१४-१५]मी
चांगला मेंढपाळ आहे; आणि, जसा पिता मला ओळखतो
आणि मी पित्याला ओळखतो तसा मी जी माझी आहेत
त्यांना ओळखतो, आणि माझी आहेत ती मला
ओळखतात; आणि मी मेंढरांसाठी माझा जीव देत आहे.
[१६]आणि, जी ह्या मेंढवाड्यातली नाहीत अशी माझी दुसरी
मेंढरं आहेत; मला त्यांनापण आणलं पाहिजे, आणि ती
माझा आवाज ऐकतील. मग त्यांचा एक कळप आणि एक
मेंढपाळ होईल. [१७]म्हणून पिता माझ्यावर प्रीती करतो,
कारण मी माझा जीव, तो परत घ्यावा म्हणून, देत आहे.
[१८]कोणी मनुष्य तो माझ्यापासून घेत नाही. पण मी तो
स्वतः होऊन देत आहे. मला तो द्यायचा अधिकार आहे,
आणि मला तो परत घ्यायचा अधिकार आहे. मला माझ्या
पित्याकडून ही आज्ञा मिळाली आहे."
[१९]म्हणून ह्या शब्दांवरून यहुद्यांत पुन्हा फूट झाली.
[२०]तेव्हा त्यांच्यातले पुष्कळ जण म्हणाले,

"त्याच्यात भूत आहे, आणि तो वेडा आहे. तुम्ही
त्याचं कशाला ऐकता?"
[२१]दुसरे म्हणाले,

"भूत लागलेल्या मनुष्याचे हे शब्द नाहीत. भूत कधी
अंधळ्याचे डोळे उघडू शकेल काय?"

[२२]हे यरुशलेमात झाले तेव्हा पुनःसमर्पणाचा सण
होता, आणि हिवाळा होता. [२३]आणि येशू मंदिरात
शलमोनाच्या देवडीत फिरत होता. [२४]म्हणून यहुदी
त्याच्या भोवती जमले आणि त्याला म्हणाले,

"आपण कुठवर आमचं मन चळवणार? आपण जर
ख्रिस्त असाल तर आम्हाला उघडपणे सांगा."
[२५]येशूने त्यांना उत्तर दिले,

"मी तुम्हाला सांगितलं आणि तुम्ही विश्वास ठेवीत
नाही. मी माझ्या पित्याच्या नावानं जी कामं करतो ती
माझ्याविषयी साक्ष देतात. [२६]पण तुम्ही विश्वास ठेवीत
नाही, कारण मी तुम्हाला म्हटल्याप्रमाणं तुम्ही माझ्या
मेंढरांतले नाही. [२७]माझी मेंढरं माझी हाक ऐकतात, मी
त्यांना ओळखतो, आणि ती माझ्यामागं येतात. [२८]आणि
मी त्यांना सनातन जीवन देतो; त्यांचा कधीही नाश होणार
नाही, आणि कोणी त्यांना माझ्या हातातून हिसकून घेणार
नाही. [२९]मला देणारा माझा पिता सर्वांपेक्षा मोठा आहे,
आणि माझ्या पित्याच्या हातातून कोणी हिसकून घेऊ
शकत नाही. [३०]मी आणि पिता एक आहोत."

[३१]तेव्हा यहुद्यांनी त्याला दगडमार करायला पुन्हा
दगड उचलले. [३२]येशूने त्यांना उत्तर दिले,

"मी माझ्या पित्याकडची पुष्कळ चांगली कामं
तुम्हाला दाखवलीत. त्या कामांतील कोणत्याकरता तुम्ही
मला दगडमार करता?"
[३३]यहुद्यांनी त्याला उत्तर दिले,

"आम्ही चांगल्या कामासाठी तुला दगडमार करीत
नाही, पण दुर्भाषणासाठी; आणि, कारण तू मनुष्य असून
तू स्वतःला देव करतोस."
[३४]येशूने त्यांना उत्तर दिले,

"तुमच्या नियमशास्त्रात, 'मी म्हणालो, तुम्ही देव
आहा', असं लिहिलं नाही काय? [३५]देवाचं वचन ज्यांना
प्राप्त झालं त्यांना जर त्यानं देव म्हटलं, आणि शास्त्रलेख
नष्ट करता येत नाही, [३६]तर 'मी देवाचा पुत्र आहे' असं मी
म्हटलं म्हणून, ज्याला पित्यानं पवित्र केलं आणि जगात
पाठवलं, त्याला 'तू दुर्भाषण करतोस' असं तुम्ही म्हणता
काय? [३७]मी जर माझ्या पित्याची कामं करीत नसेन तर
माझ्यावर विश्वास ठेवू नका. [३८]पण मी करीत असेन तरी
माझ्यावर विश्वास ठेवीत नसाल, तर त्या कामांवर
विश्वास ठेवा. म्हणजे तुम्हाला कळावं आणि समजावं
की, माझ्यात पिता आहे आणि मी पित्यात आहे."

[३९]त्यांनी पुन्हा त्याला धरायचा प्रयत्न केला, पण तो
त्यांच्या हातातून सुटला; [४०]आणि पुन्हा यार्देनेच्या दुसऱ्या
बाजूस, जेथे योहान प्रथम बाप्तिस्मा करीत असे त्या
ठिकाणी जाऊन राहिला.

[४१]आणि पुष्कळ जण त्याच्याकडे येत आणि म्हणत,

"योहानानं कोणतंही चिन्ह केलं नाही, पण योहान
ह्याच्याविषयी जे काही बोलला ते सगळं खरं होतं."
[४२]आणि पुष्कळ जणांनी तेथे त्याच्यावर विश्वास ठेवला.

११ आता बेथानीचा लाजर म्हणून एक
मनुष्य आजारी होता. हे मरिया व तिची बहीण
मार्था ह्यांचे गाव. [२]जिने सुवासिक तेल घेऊन प्रभूला
लावले व आपल्या केसांनी त्याचे पाय धुतले ती ही मरिया
होती. आणि तिचा भाऊ लाजर आजारी होता.

[३]म्हणून त्याच्या बहिणींनी त्याला निरोप पाठवून
कळवले, 'प्रभू, बघा, आपण ज्याच्यावर प्रीती करता तो
आजारी आहे.' [४]पण येशूने ते ऐकले तेव्हा तो म्हणाला,
'हा आजार मरणासाठी नाही, पण देवाच्या गौरवासाठी
आहे; म्हणजे देवाच्या पुत्राचं त्यामुळं गौरव व्हावं.'
[५]आता मरिया व तिची बहीण मार्था, आणि लाजर
ह्यांच्यावर येशू प्रीती करीत असे. [६]त्याकरता तो आजारी
होता हे त्याने ऐकले त्यावेळी तो जेथे होता त्या ठिकाणी
तो दोन दिवस राहिला. [७]मग, त्यानंतर, तो शिष्यांना
म्हणतो,

"आपण पुन्हा यहुदियात जाऊ या."
[८]शिष्य त्याला म्हणतात,

"रब्बी, यहुदी आपल्याला आताच दगडमार करू
पहात होते आणि आपण पुन्हा तिकडे जाऊ पाहता?"
[९]येशूने उत्तर दिले,

"दिवसाचे बारा तास असतात ना? कोणी दिवसा
चालल्यास तो अडखळणार नाही, कारण त्याला ह्या
जगाचा प्रकाश दिसतो; [१०]पण कोणी रात्री चालल्यास तो
अडखळतो, कारण त्याच्यात प्रकाश नाही."

[११]तो ह्या गोष्टी बोलला, आणि त्यानंतर तो त्यांना
म्हणतो,

"आपला मित्र लाजर आजारी आहे, पण मी त्याला झोपेतून उठवावं म्हणून जातो."

[१२]म्हणून त्याचे शिष्य त्याला म्हणाले,

"प्रभू, तो निजला असेल तर बरा होईल."

[१३]आता येशू त्याच्या मरणाविषयी बोलला. पण त्यांना वाटले तो झोपेत विसावा घेण्याविषयी बोलला.

[१४]मग येशू उघडपणे म्हणाला,

"लाजर मेला आहे. [१५]आणि तुम्ही विश्वास ठेवावा म्हणून तुमच्याकरता मी आनंद करतो की, मी तिथं नव्हतो; पण आपण त्याच्याकडे जाऊ या."

[१६]मग ज्याला दिदुम म्हणत तो थोमा आपल्या जोडीच्या शिष्यांना म्हणाला,

"आपणपण जाऊ या; म्हणजे आपण त्याच्या बरोबर मरू."

[१७]मग येशू आला तेव्हा तो चार दिवस थडग्यात होता हे त्याला समजले. [१८]आता बेथानी यरुशलेमजवळ सुमारे एक कोसावर होती. [१९]आणि यहुद्यांपैकी पुष्कळ जण मार्था व मरिया ह्यांच्याकडे त्यांच्या भावासाठी त्यांचे सांत्वन करायला आले होते. [२०]म्हणून येशू येत आहे हे मार्थेने ऐकले तेव्हा ती जाऊन त्याला भेटली, पण मरिया घरी बसली. [२१]तेव्हा मार्था येशूला म्हणाली,

"प्रभू, आपण इथं असता तर माझा भाऊ मेला नसता. [२२]पण मी जाणते की, आतासुद्धा आपण देवाजवळ मागाल ते देव आपल्याला देईल."

[२३]येशू तिला म्हणतो,

"तुझा भाऊ पुन्हा उठेल."

[२४]मार्था त्याला म्हणते,

"तो पुनरुत्थानात शेवटच्या दिवशी पुन्हा उठेल हे मी जाणते."

[२५]येशू तिला म्हणाला,

"पुनरुत्थान आणि जीवन मी आहे. जो माझ्यावर विश्वास ठेवतो तो जरी मेला तरी जिवंत राहील, [२६]आणि जो जिवंत आहे आणि माझ्यावर विश्वास ठेवतो तो कधीही मरणार नाही, ह्यावर तू विश्वास ठेवतेस काय?"

[२७]ती त्याला म्हणाली,

"हो, प्रभू, मी विश्वास ठेवते की, जगात येणार आहे तो देवाचा पुत्र तू आहेस."

[२८]आणि एवढे बोलून ती गेली व तिने आपली बहीण मरिया हिला एकीकडे बोलवून म्हटले, 'गुरू आलेत आणि तुला बोलवीत आहेत.'

[२९]तिने हे ऐकले, तेव्हा ती लवकर उठून त्याच्याकडे आली. [३०]आता, येशू अजून गावात आला नव्हता, पण मार्था त्याला जेथे भेटली त्याच ठिकाणी होता.

[३१]तेव्हा जे यहुदी तिच्याबरोबर घरात होते व तिचे सांत्वन करीत होते, त्यांनी बघितले की, मरिया घाईघाईने उठून निघाली; तेव्हा ती थडग्याकडे रडायला निघून गेली, असे समजून ते तिच्या मागोमाग गेले. [३२]मग जेथे येशू होता तेथे मरिया आली, आणि तिने त्याला बघितले तेव्हा ती त्याच्या पायाशी पालथी पडली व त्याला म्हणाली,

"प्रभू, आपण इथं असता तर माझा भाऊ मेला नसता."

[३३]म्हणून जेव्हा, ती रडत होती व तिच्याबरोबर आलेले यहुदीही रडत होते हे येशूने बघितले तेव्हा तो आत्म्यात कण्हला व अस्वस्थ झाला; [३४]आणि म्हणाला,

"तुम्ही त्याला कुठं ठेवलंत?"

ते त्याला म्हणाले,

"प्रभू, या आणि बघा."

[३५]येशू रडला. [३६]तेव्हा ते यहुदी म्हणाले,

"बघा हा त्याच्यावर कशी प्रीती करीत होता?"

[३७]पण त्यांच्यातले कोणी म्हणाले,

"ज्यानं त्या अंधळ्याचे डोळे उघडले त्याला हा मनुष्य मरू नये असंही करता आलं नसतं काय?"

[३८]म्हणून येशू पुन्हा आतल्या आत कण्हत कबरेकडे येतो. ती एक गुहा होती व तिला एक शिळा लावलेली होती. [३९]येशू म्हणतो,

"तुम्ही ती शिळा काढा."

मृताची बहीण मार्था त्याला म्हणते,

"प्रभू, आतापर्यंत त्याला दुर्गंधी येत असेल; कारण तो चार दिवस आहे."

[४०]येशू तिला म्हणतो,

"मी तुला नव्हतो म्हणालो की, तू जर विश्वास ठेवशील तर तू देवाचं गौरव पाहशील?"

[४१]तेव्हा त्यांनी शिळा काढली; आणि येशूने डोळे वर लावले व तो म्हणाला,

"बापा, तू माझं ऐकलंस म्हणून मी तुझे उपकार मानतो. [४२]मला हे माहीत होतं की, तू माझं नेहमी ऐकतोस, पण जे लोक सभोवती उभे आहेत त्यांच्याकरता मी हे बोललो, म्हणजे त्यांनी विश्वास ठेवावा की, तू मला पाठवलं आहेस."

४३आणि एवढे बोलून तो मोठ्या आवाजात
ओरडला,
"लाजर, बाहेर ये."
४४आणि जो मेला होता तो बाहेर आला; त्याचे पाय व
त्याचे हात प्रेतवस्त्रांनी बांधलेले व तोंड रुमालाने
गुंडाळलेले होते. येशू त्यांना म्हणतो,
"त्याला सोडवा आणि जाऊ द्या."
४५तेव्हा मरियेकडे आलेल्या ज्या यहुद्यांनी त्याने
केलेल्या गोष्टी पाहिल्या होत्या त्यांच्यातल्या पुष्कळांनी
त्याच्यावर विश्वास ठेवला; ४६पण त्यांच्यातले काही
परोश्यांकडे गेले व त्यांनी त्यांना येशूने केलेल्या गोष्टी
सांगितल्या.

४७**मग वरिष्ठ याजक** व परोशी ह्यांनी न्यायसभा
भरवून म्हटले,
"आपण काय करणार आहो? कारण हा मनुष्य
पुष्कळ चिन्हं करीत आहे. ४८आपण त्याला असंच राहू
दिलं तर सगळे त्याच्यावर विश्वास ठेवतील; आणि रोमी
येऊन आपलं स्थान, आणि आपलं राष्ट्रही हस्तगत
करतील."
४९तेव्हा त्यांच्यातला एक जण, त्या वर्षी श्रेष्ठ याजक
असलेला कयफा, त्यांना म्हणाला,
"तुम्ही काहीच जाणत नाही. ५०आणि तुम्ही विचार
करीत नाही की, एका मनुष्यानं लोकांसाठी मरावं हे
हिताचं आहे; आणि सर्व राष्ट्राचा नाश होऊ नये."
५१आणि हे तो स्वतः होऊन बोलला नाही; पण त्या
वर्षी तो श्रेष्ठ याजक असल्यामुळे त्याने संदेश दिला की,
येशूने राष्ट्रासाठी मरावे; ५२आणि राष्ट्रासाठी केवळ नाही,
पण त्याने देवाची पांगलेली मुलेही एकात एकत्र आणावीत
ह्यासाठी.
५३मग ते त्या दिवसापासून, आपण त्याला कसे ठार
मारावे ह्याचा विचार करू लागले. ५४म्हणून त्यानंतर येशू
यहुद्यांत उघडपणे फिरला नाही; पण तो तेथून जवळच्या
प्रांतात, एफ्राईम नावाच्या नगरात गेला व तेथे आपल्या
शिष्यांबरोबर राहिला.

५५**आता यहुद्यांचा वल्हांडण** जवळ आला होता;
आणि वल्हांडणाच्या अगोदर, आपल्या स्वतःला शुद्ध
करायला, त्या प्रांतातून पुष्कळ लोक वर यरुशलेमला गेले
होते. ५६आणि त्यांनी येशूचा शोध केला व ते मंदिरात उभे
असताना त्यांनी एकमेकांना म्हटले,
"तुम्हाला काय वाटतं? तो सणाला येणार नाही
काय?"
५७आता वरिष्ठ याजक व परोशी ह्यांनी आपण त्याला
धरावे म्हणून अशी आज्ञा दिली होती की, जर कोणाला तो
कोठे आहे हे कळले तर त्याने कळवावे.

## १२

**मग येशू वल्हांडणाच्या** सहा दिवस
आधी बेथानीस आला. आणि येशूने ज्याला
मेलेल्यांतून उठवले होते तो लाजर तेथे होता. २त्यांनी तेथे
त्याच्यासाठी रात्रीचे भोजन केले, आणि मार्था वाढीत
होती. पण त्याच्याबरोबर भोजनास बसलेल्यांत लाजर हा
एक होता. ३तेव्हा मरियेने एक माप, शुद्ध जटामांसीचे,
अतिमोलवान सुवासिक तेल घेतले व ते येशूच्या पायांना
लावून आपल्या केसांनी त्याचे पाय पुसले; आणि
तेलाच्या सुवासाने घर भरले.
४तेव्हा, त्याच्या शिष्यांतला एक, त्याला धरून देणार
होता तो यहुदा इस्कार्योत म्हणाला,
५"हे सुवासिक तेल तीनशे दिनारांना का विकलं
नाही? आणि गरिबांना दिलं नाही?"
६तो गरिबांची काळजी करीत होता म्हणून हे बोलला असे
नाही, पण तो चोर होता म्हणून हे बोलला. त्याच्याजवळ
डबा होता आणि तो त्यात टाकलेले घेऊन जाई. ७तेव्हा
येशू म्हणाला,
"तिला राहू दे; मला पुरायच्या दिवसासाठी तिला हे
ठेवू दे. ८कारण गरीब तुमच्याबरोबर नेहमी आहेत, पण मी
तुमच्याबरोबर नेहमी नाही."
९म्हणून यदुद्यांतील पुष्कळ लोकांना तो तेथे होता हे
कळले होते; आणि येशूसाठी केवळ नाही, पण त्याने
ज्याला मेलेल्यांतून उठवले होते त्या लाजरालाही बघावे
म्हणून ते आले होते. १०पण वरिष्ठ याजकांनी आपण
लाजरालाही ठार मारावे असा विचार केला. कारण
११यहुद्यांतील पुष्कळ लोक त्याच्यामुळे गेले, आणि
त्यांनी येशूवर विश्वास ठेवला.

१२**दुसऱ्या दिवशी,** सणाला आलेल्या पुष्कळ
लोकांनी येशू यरुशलेमला येत आहे हे ऐकले. १३तेव्हा
त्यांनी खजुरीच्या झावळ्या घेतल्या आणि ते त्याची भेट
घ्यायला बाहेर निघाले, आणि ओरडत म्हणू लागले,

"होसान्ना! प्रभूच्या नावानं येणारा धन्य इस्राएलाचा
राजा!"
[१४]आणि येशूला एक शिंगरू मिळाल्यावर तो त्यावर
बसला. कारण असे लिहिले आहे की,
[१५]'सियोनकन्ये, भिऊ नको,
बघ, तुझा राजा
गाढवीच्या शिंगरावर बसून येत आहे.'
[१६]त्याच्या शिष्यांना प्रथम ह्या गोष्टी कळल्या नाहीत, पण
जेव्हा येशूचे गौरव झाले, तेव्हा त्यांना आठवले की, हे
त्याच्याविषयी लिहिले होते, आणि त्यांनी त्याला हे केले.
[१७]म्हणून जेव्हा त्याने लाजराला त्याच्या थडग्यातून
बोलावले व मेलेल्यांतून उठवले तेव्हा त्याच्याबरोबर जे
लोक होते त्यांनी त्याच्याविषयी साक्ष दिली. [१८]लोक
ह्याही कारणामुळे जाऊन त्याला भेटले, कारण त्याने हे
चिन्ह केले होते हे त्यांनी ऐकले होते. [१९]तेव्हा परोशी
एकमेकांस म्हणाले,
"विचार करा, तुमचं कसं काही चालत नाही. बघा,
त्याच्यामागं जग गेलं आहे."

[२०]**आता जे लोक उपासना** करायला ह्या सणात वर
आले त्यांच्यात काही हेल्लेणी होते. [२१]म्हणून ते
फिलिपाकडे आले; तो गालिलातील बेथसैदा येथील होता
आणि त्यांनी त्याला विनंती करून म्हटले,
"महाराज, आमची येशूला भेटायची इच्छा आहे."
[२२]फिलिप जाऊन अंद्रियाला सांगतो; अंद्रिया व फिलिप
जाऊन येशूला सांगतात. [२३]आणि येशूने त्यांना उत्तर देऊन
म्हटले,
"मनुष्याच्या पुत्राचं गौरव व्हायची घटका आली
आहे. [२४]मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो, गव्हाचा दाणा
जर जमिनीत पडून मेला नाही, तर तो एकटा राहतो; पण
तो मेला तर तो पुष्कळ पीक देतो. [२५]जो आपल्या जिवाचा
लोभ धरतो तो त्याला मुकतो आणि जो ह्या जगात
आपल्या जिवाचा द्वेष करतो तो त्याला सार्वकालिक
जीवनासाठी राखील. [२६]जर कोणी माझी सेवा करील तर
त्यानं माझ्यामागं यावं, आणि मी जिथं आहे तिथं माझा
सेवकही असेल. जर कोणी माझी सेवा करील तर पिता
त्याला मान देईल.
[२७]"आता माझा जीव अस्वस्थ होत आहे, आणि मी
काय बोलू? बापा, तू ह्या घटकेतून मला राख पण मी ह्या
कारणासाठीच ह्या घटकेत आलो आहे. [२८]बापा, तू
आपल्या नावाचं गौरव कर."
तेव्हा आकाशातून वाणी झाली,
'मी गौरवलं आहे आणि पुन्हा गौरवीन.'
[२९]म्हणून जे लोक सभोवती उभे होते आणि ज्यांनी हे
ऐकले ते म्हणाले,
"हा गडगडाट झाला."
दुसरे म्हणाले,
"त्याच्याशी देवदूत बोलला."
[३०]येशूने त्यांना उत्तर देऊन म्हटले,
"माझ्यासाठी ही वाणी झाली नाही पण तुमच्यासाठी.
[३१]आता ह्या जगाचा न्याय आहे; आता ह्या जगाचा
अधिपती बाहेर टाकला जाईल. [३२]आणि मला जर
पृथ्वीपासून वर चढवलं तर मी सर्वांना माझ्याकडे
ओढीन."
[३३]तो आपल्याला कोणत्या मरणाने मेले पाहिजे हे प्रगट
करायला असे बोलला. [३४]लोकांनी त्याला उत्तर देऊन
म्हटले,
"ख्रिस्त सर्वकाळ राहील असं आम्ही नियमशास्त्रातून
ऐकलं आहे. आणि, आपण कसं म्हणता की, मनुष्याचा
पुत्र वर चढवला गेला पाहिजे? हा मनुष्याचा पुत्र कोण
आहे?"
[३५]म्हणून येशू त्यांना उत्तर देऊन म्हणाला,
"आणखी अल्पकाळ तुमच्याबरोबर प्रकाश आहे;
तुम्हाला प्रकाश आहे तोवर चाला; नाहीतर, अंधार
तुम्हाला गाठील; जो अंधारात चालतो त्याला आपण कुठं
जातो हे कळत नाही. [३६]तुम्हाला प्रकाश आहे तोवर
प्रकाशावर विश्वास ठेवा; म्हणजे तुम्ही प्रकाशाचे पुत्र
व्हाल."
येशू हे बोलला आणि निघून गेला, आणि त्याने
त्यांच्यापासून स्वतःला लपवले.

[३७]**पण जरी त्याने** त्यांच्यासमोर इतकी चिन्हे केली
होती तरी त्यांनी त्याच्यावर विश्वास ठेवला नाही;
[३८]म्हणजे यशया संदेष्टा जे म्हणाला, ते त्याचे वचन पूर्ण
व्हावे,
'प्रभू, आमच्याकडून ऐकले त्यावर
कोणी विश्वास ठेवला आहे?
परमेश्वराचा बाहू कोणाला प्रगट झाला आहे?'

[३९]म्हणून त्यांना विश्वास ठेवता आला नाही; कारण
यशया पुन्हा म्हणाला,

[४०]'त्याने त्यांचे डोळे अंधळे केले आहेत
आणि त्यांचे मन कठिण केले आहे;
म्हणजे त्यांनी डोळ्यांनी बघू नये,
आणि मनाने समजू नये,
त्यांनी वळू नये,
आणि मी त्यांना बरे करू नये.'

[४१]जेव्हा यशयाने त्याचे गौरव बघितले व तो
त्याच्याविषयी बोलला तेव्हा त्याने ह्या गोष्टी सांगितल्या.

[४२]तरी अधिकाऱ्यांतही पुष्कळांनी त्याच्यावर
विश्वास ठेवला, पण त्यांनी आपण सभास्थानबहिष्कृत
केले जाऊ नये म्हणून ते परोश्यांमुळे पतकरले नाही.
[४३]कारण त्यांना देवाकडच्या मानापेक्षा मनुष्याकडचा मान
अधिक आवडला.

[४४]आणि येशू ओरडून म्हणाला,

"जो माझ्यावर विश्वास ठेवतो, तो माझ्यावर नाही,
तर ज्यानं मला धाडलं त्याच्यावर विश्वास ठेवतो.
[४५]आणि जो मला पाहतो तो ज्यानं मला धाडलं त्याला
पाहतो. [४६]मी जगात प्रकाश म्हणून आलो आहे; आणि जो
कोणी माझ्यावर विश्वास ठेवतो त्यानं अंधारात राहू नये.
[४७]कोणी जर माझी वचनं ऐकतो आणि ती पाळीत नाही,
तर मी त्याचा न्याय करीत नाही; कारण मी जगाचा न्याय
करायला नाही, पण मी जगाचं तारण करायला आलो.
[४८]जो माझा अवमान करतो आणि माझी वचनं स्वीकारीत
नाही त्याचा न्याय करायला एक आहे. मी जे वचन
सांगितलं आहे तेच त्याचा, शेवटच्या दिवशी, न्याय
करील. [४९]कारण मी स्वतःचं बोललो नाही, पण ज्या
पित्यानं मला धाडलं त्यानं मला मी काय सांगावं आणि
काय बोलावं ह्याची आज्ञा दिली आहे. [५०]आणि मी हे
जाणतो की, त्याची आज्ञा सनातन जीवन आहे. म्हणून मी
ज्या गोष्टी बोलतो त्या पित्यानं मला जशा सांगितल्यात
तशा बोलतो."

१३ आता, वल्हांडण सणाअगोदर जेव्हा
येशू जाणत होता की, त्याची ह्या जगातून
पित्याकडे निघून जायची घटका आली होती, तेव्हा त्याने,
जे त्याचे स्वतःचे जगात होते त्यांच्यावर प्रीती केली
असल्यामुळे, त्यांच्यावर शेवटपर्यंत प्रीती केली.

[२]ह्यावेळी सैतानाने शिमोनाचा पुत्र यहुदा इस्कार्योत
ह्याच्या मनात त्याला धरून द्यावे असे घातले होते, आणि
रात्रीचे भोजन होत असता [३]येशू जाणत होता की, पित्याने
त्याच्या हातात सर्व दिले होते, आणि तो देवाकडून आला
होता व देवाकडे जात होता; [४]तेव्हा तो भोजनावरून
उठतो; त्याने आपली वस्त्रे एकीकडे ठेवली, आणि एक
फडका घेऊन आपल्या कमरेला बांधला. [५]त्यानंतर येशू
एका भांड्यात पाणी ओततो; आणि तो शिष्यांचे पाय धुऊ
लागला व कमरेला बांधलेल्या फडक्याने पुसू लागला.
[६]मग तो शिमोन पेत्राकडे येतो; तेव्हा तो त्याला म्हणतो,

"प्रभू, तू माझे पाय धुतोस?"

[७]येशूने त्याला उत्तर देऊन म्हटले,

"मी काय करतो हे तू आता जाणत नाहीस, पण तुला
पुढे कळेल."

पेत्र त्याला म्हणतो,

[८]"तुला माझे पाय कधीच धुवायचे नाहीत."

येशूने त्याला उत्तर दिले,

"मी जर तुला धुतलं नाही, तर तुला माझ्याबरोबर
वाटा नाही."

[९]शिमोन पेत्र त्याला म्हणतो,

"प्रभू, माझे पायच नाही, पण हात आणि डोकंपण
धू."

[१०]येशू त्याला म्हणतो,

"ज्याचं स्नान झालं आहे त्याला पायांशिवाय काही
धुवायची गरज नाही, तर तो सर्वांगी शुद्ध आहे; तुम्ही शुद्ध
आहा, पण सगळे नाही."

[११]कारण त्याला कोण धरून देईल हे तो जाणत होता,
म्हणून तो म्हणाला, 'तुम्ही सगळे शुद्ध नाही.'

[१२]मग त्याने त्यांचे पाय धुतल्यावर आपली वस्त्रे
घेतली व तो पुन्हा खाली बसल्यावर त्यांना म्हणाला,

"मी तुम्हाला काय केलं ते तुम्हाला समजलं का?
[१३]तुम्ही मला गुरू आणि प्रभू म्हणता, आणि ठीक
म्हणता; कारण मी आहे. [१४]मग मी जर तुमचा प्रभू आणि
गुरू असता तुमचे पाय धुतले तर तुम्हीपण एकमेकांचे पाय
धुवावेत.

[१५]"कारण मी तुम्हाला केलं तसं तुम्हीही करावं
म्हणून मी तुम्हाला उदाहरण दिलं आहे. [१६]मी तुम्हाला

सत्य सत्य सांगतो, दास आपल्या धन्याहून मोठा नाही; आणि ज्याला पाठवलं आहे तो त्याला धाडणाऱ्याहून मोठा नाही. १७तुम्हाला जर ह्या गोष्टी समजल्या तर तुम्ही त्या केल्यात तर तुम्ही धन्य!

१८"मी तुमच्यातील सर्वांविषयी बोलत नाही. मी ज्यांना निवडलं आहे त्यांना मी ओळखतो. पण, 'ज्याने माझी भाकर खाल्ली त्यानेच माझ्याविरुद्ध आपली टाच उचलली', हा शास्त्रलेख पूर्ण व्हावा म्हणून, १९जे होईल त्याअगोदर, मी आतापासून तुम्हाला सांगतो, म्हणजे ते होईल, तेव्हा तुम्ही विश्वास ठेवावा की, मी तो आहे. २०मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो, मी ज्याला धाडलं त्याचा जो स्वीकार करतो तो माझा स्वीकार करतो, आणि जो माझा स्वीकार करतो तो ज्यानं मला धाडलं त्याचा स्वीकार करतो."

२१एवढे बोलून येशू आत्म्यात अस्वस्थ झाला आणि साक्ष देऊन म्हणाला,

"मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो, तुमच्यातला एक मला धरून देईल."

२२तो कोणाविषयी बोलला म्हणून शिष्य साशंक होऊन एकमेकांकडे पाहू लागले. २३तेव्हा येशू ज्याच्यावर प्रीती करीत असे, असा त्याच्या शिष्यांतला एक जण येशूच्या उराशी भोजनास बसला होता. २४म्हणून शिमोन पेत्र त्याला खुणावतो आणि म्हणतो,

"तो कोणाविषयी बोलतो ते सांग."

२५तो येशूच्या छातीशी लागून त्याला म्हणतो,

"प्रभू, तो कोण?"

२६येशूने उत्तर दिले,

"मी ज्याला हा घास भिजवून देईन, तोच तो आहे."

आणि त्याने तो घास भिजवल्यावर, तो शिमोनाचा पुत्र यहुदा इस्कार्योत ह्याला दिला. २७आणि त्या घासानंतर सैतान तेव्हा त्याच्यात शिरला. म्हणून येशू त्याला म्हणतो,

"तू जे करणार ते लवकर कर."

२८पण तो हे कशाकरता बोलला ते भोजनास बसलेल्या कोणालाही समजले नाही. २९कारण यहुदाजवळ डबा असल्यामुळे कोणी समजले की, 'आपल्याला सणात कशाची गरज आहे ते विकत घे,' किंवा गरिबांना काही द्यावे असे येशू त्याला म्हणाला होता. ३०मग घास घेतल्यावर तो लगेच बाहेर गेला; आणि रात्र होती.

३१म्हणून तो बाहेर गेल्यावर येशू म्हणाला,

"आता मनुष्याच्या पुत्राचं गौरव झालं आहे, आणि, त्याच्या ठायी देवाचं गौरव झालं आहे; ३२जर त्याच्या ठायी देवाचं गौरव झालं तर देवही आपल्या ठायी त्याला गौरवील. आणि, लगेच, त्याला गौरवील. ३३मुलांनो, मी अजून थोडा वेळ तुमच्याबरोबर आहे; तुम्ही मला शोधाल; आणि मी यहुद्यांना म्हणालो तसंच मी तुम्हाला म्हणतो, 'मी जाईन तिकडे तुम्हाला येता येणार नाही.' ३४मी एक नवी आज्ञा तुम्हाला देतो; तुम्ही एकमेकांवर प्रीती करा. मी तुमच्यावर प्रीती केली तशी तुम्हीही एकमेकांवर प्रीती करा. ३५तुमची एकमेकांवर प्रीती असेल तर ह्यावरून सर्व ओळखतील की, तुम्ही माझे शिष्य आहा."

३६शिमोन पेत्र त्याला म्हणाला,

"प्रभू, तू कुठं जातोस?"

येशूने त्याला उत्तर दिले,

"मी जाईन तिकडे, आता, तुला माझ्यामागं येता येणार नाही; पण नंतर तू माझ्यामागं येशील."

३७पेत्र त्याला म्हणाला,

"प्रभू, मला तुझ्यामागं का येता येणार नाही? मी तुझ्याकरता माझा जीव देईन."

३८येशूने त्याला उत्तर दिले,

"तू माझ्याकरता तुझा जीव देशील काय? मी तुला सत्य सत्य सांगतो, तू मला तीनदा नाकारशील तोपर्यंत कोंबडा आरवणार नाही."

१४ "तुमचं मन अस्वस्थ होऊ देऊ नका; देवावर विश्वास ठेवा, माझ्यावर विश्वास ठेवा. २माझ्या पित्याच्या घरात पुष्कळ वसतीच्या जागा आहेत. नसत्या तर, मी तुम्हाला सांगितलं असतं; कारण मी तुमच्यासाठी जागा तयार करायला जातो ३आणि, मी जर गेलो आणि मी तुमच्यासाठी जागा तयार केली तर मी पुन्हा येईन आणि तुम्हाला माझ्याजवळ घेईन; म्हणजे जिथं मी आहे तिथं तुम्ही पण असावं. ४आणि मी कुठं जातो तो मार्ग तुम्हाला माहीत आहे."

५थोमा त्याला म्हणतो,

"प्रभू, आपण कुठं जाता ते आम्हाला माहीत नाही; मग मार्ग कसा माहीत आहे?"

[६]येशू त्याला म्हणतो,
"मार्ग, सत्य आणि जीवन मी आहे. माझ्याद्वारे
आल्याशिवाय कोणी पित्याकडे येत नाही. [७]तुम्ही मला
ओळखलं असतं तर माझ्या पित्यालाही ओळखलं असतं.
तुम्ही त्याला आता ओळखता आणि तुम्ही त्याला पाहिलं
आहे."
[८]फिलिप त्याला म्हणतो,
"प्रभू, आम्हाला पिता दाखवा, आणि आम्हाला
तेवढं पुरे आहे."
[९]येशू त्याला म्हणतो,
"मी इतका दीर्घकाळ तुमच्याबरोबर आहे आणि,
फिलिपा, तू मला ओळखीत नाहीस? ज्यानं मला पाहिलं
आहे त्यानं पित्याला पाहिलं आहे; आणि 'आम्हाला पिता
दाखवा' असं कसं म्हणतोस? [१०]मी पित्यात आहे, आणि
पिता माझ्यात आहे, ह्यावर तू विश्वास ठेवीत नाहीस
काय? मी जे शब्द तुमच्याशी बोलतो ते मी स्वतःचे
बोलत नाही; पण माझ्यात राहणारा पिता स्वतःची कामं
करतो. [११]तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवा की, मी पित्यात
आहे आणि पिता माझ्यात आहे; किंवा ह्या कामांकरता
तरी तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवा.
[१२]"मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो, जो माझ्यावर
विश्वास ठेवतो, तोपण मी करतो ती कामं करील. आणि,
ह्यांहून अधिक मोठ्या गोष्टी करील, कारण मी पित्याकडे
जात आहे, [१३]आणि माझ्या नावानं तुम्ही जे काही मागाल
ते पुत्राद्वारे पित्याचं गौरव व्हावं म्हणून मी करीन.
[१४]माझ्या नावानं तुम्ही काही मागाल तर ते मी करीन.
[१५]"तुम्ही माझ्यावर प्रीती करता तर तुम्ही माझ्या
आज्ञा पाळाल. [१६]मी पित्याला विनंती करीन, आणि, तो
तुमच्याबरोबर सर्वकाळ राहायला दुसरा कैवारी तुम्हाला
देईल. [१७]तो सत्याचा आत्मा आहे; जग त्याला पहात नाही
आणि ओळखीत नाही म्हणून ते त्याचा स्वीकार करू
शकत नाही. पण तो तुमच्याबरोबर राहतो, म्हणून तुम्ही
त्याला ओळखता, आणि तो तुमच्यात राहील.
[१८]"मी तुम्हाला अनाथ सोडणार नाही; मी
तुमच्याकडे येईन. [१९]आणखी थोडा वेळ, आणि जग मला
पुढं पाहणार नाही. पण तुम्ही मला पहाल; कारण मी
जिवंत आहे, आणि तुम्हीही जिवंत असाल. [२०]त्या
दिवशी तुम्हाला समजेल की, मी माझ्या पित्यात आहे,
तुम्ही माझ्यात आहा, आणि मी तुमच्यात आहे.
[२१]ज्याच्याजवळ माझ्या आज्ञा आहेत आणि जो त्या
पाळतो तोच माझ्यावर प्रीती करतो. आणि जो माझ्यावर
प्रीती करतो त्याच्यावर माझा पिता प्रीती करील; आणि मी
त्याच्यावर प्रीती करीन आणि स्वतः त्याला प्रगट होईन."
[२२]यहुदा त्याला म्हणतो (इस्कार्योत नव्हे),
"प्रभू, असं काय झालं की, आपण आम्हाला प्रगट
व्हाल आणि जगाला नाही?"
[२३]येशूने त्याला उत्तर देऊन म्हटले,
"कोणीही माझ्यावर प्रीती करील तर तो माझं वचन
पाळील; आणि त्याच्यावर माझा पिता प्रीती करील;
आणि आम्ही त्याच्याकडे येऊ, आणि त्याच्याकडे
आमचं वसतीचं ठिकाण करू. [२४]जो माझ्यावर प्रीती
करीत नाही तो माझी वचनं पाळीत नाही. आणि तुम्ही जे
वचन ऐकता ते माझं नाही पण ज्यानं मला धाडलं त्या
पित्याचं आहे.
[२५]"मी तुमच्याबरोबर रहात असताना मी ह्या गोष्टी
तुम्हाला सांगितल्यात. [२६]पण पिता ज्याला माझ्या नावानं
धाडील तो कैवारी म्हणजे पवित्र आत्मा तुम्हाला सर्व
गोष्टी शिकवील; आणि मी ज्या गोष्टी तुम्हाला
सांगितल्यात त्या सर्व गोष्टींची तुम्हाला आठवण देईल.
[२७]मी तुम्हाला शांती ठेवतो; माझी शांती तुम्हाला देतो.
जग देतं तशी मी तुम्हाला देत नाही; तुमचं मन अस्वस्थ
होऊ देऊ नका, किंवा भयभीत होऊ देऊ नका. [२८]तुम्ही
ऐकलंत की, मी तुम्हाला म्हणालो, 'मी जातो आणि
तुमच्याकडे परत येईन.' तुम्ही माझ्यावर प्रीती करीत
असता तर मी पित्याकडे जातो म्हणून तुम्ही आनंद केला
असता, कारण पिता माझ्यापेक्षा मोठा आहे. [२९]आणि
आता, ते होण्याअगोदर, मी तुम्हाला सांगितलं आहे,
म्हणजे ते होईल तेव्हा तुम्ही विश्वास ठेवावा. [३०]मी
तुमच्याशी, ह्यापुढं, फार बोलणार नाही, कारण जगाचा
अधिपती येत आहे, आणि माझ्यात त्याला काही नाही.
[३१]पण मी पित्यावर प्रीती करतो, आणि पित्यानं मला
आज्ञा दिली तसं मी करतो, हे जगाला समजलं पाहिजे.
उठा, इथून चला.

१५ "मी खरा द्राक्षवेल आहे आणि माझा
पिता माळी आहे. [२]तो माझ्यातला, फळ न
देणारा, प्रत्येक फाटा काढून टाकतो. आणि फळ देणाऱ्या
प्रत्येक फाट्यानं अधिक फळ द्यावं म्हणून तो त्याला
स्वच्छ करतो. [३]मी तुम्हाला सांगितलेल्या वचनांमुळं,

आता, तुम्ही स्वच्छ आहा. ४तुम्ही माझ्यात रहा, आणि
मी तुमच्यात राहीन, फाटा वेलीत राहिल्याशिवाय त्याला
स्वतः फळ देता येत नाही, तसंच तुम्हालाही माझ्यात
राहिल्याशिवाय येणार नाही. ५मी वेल आहे, तुम्ही फाटे
आहा; जो माझ्यात राहतो आणि मी त्याच्यात राहतो तो
पुष्कळ फळ देतो, कारण माझ्यापासून वेगळे असल्यास
तुम्हाला काही करता येत नाही. ६कोणी माझ्यात राहिला
नाही, तर तो फाट्यासारखा फेकला जातो, आणि वाळून
जातो. ते गोळा करून अग्नीत टाकतात आणि जाळतात.
७जर तुम्ही माझ्यात राहिला आणि माझी वचनं तुमच्यात
राहिली तर तुम्ही इच्छीत असाल ते मागा आणि
तुमच्यासाठी ते केलं जाईल. ८तुम्ही पुष्कळ फळ दिल्यानं
माझ्या पित्याचं गौरव होतं; आणि तुम्ही त्यायोगे माझे
शिष्य व्हाल. ९पित्यानं माझ्यावर प्रीती केली तशीच मी
तुमच्यावर प्रीती केली; तुम्ही माझ्या प्रीतीत रहा. १०मी
माझ्या पित्याच्या आज्ञा पाळल्यात आणि त्याच्या प्रीतीत
राहतो, तसेच तुम्ही माझ्या आज्ञा पाळाल तर तुम्ही माझ्या
प्रीतीत रहाल. ११माझा आनंद तुमच्यात रहावा आणि
तुमचा आनंद पूर्ण व्हावा म्हणून मी हे तुमच्याशी बोलतो.

१२"माझी आज्ञा ही आहे की, मी तुमच्यावर प्रीती
केली तशीच तुम्ही एकमेकांवर प्रीती करा. १३आपल्या
मित्रांसाठी आपला जीव द्यावा ह्याहून मोठी प्रीती
कोणाच्याजवळ नाही. १४मी तुम्हाला ज्या गोष्टींची आज्ञा
देतो त्या तुम्ही कराल तर तुम्ही माझे मित्र आहा. १५मी
तुम्हाला आतापासून दास म्हणत नाही, कारण धनी काय
करतो ते दासाला कळत नाही; पण मी तुम्हाला मित्र
म्हटलं आहे, कारण मी जे पित्याकडून ऐकलं आहे ते मी
तुम्हाला कळवलं आहे. १६तुम्ही मला निवडलं नाही, पण
मी तुम्हाला निवडलं आहे आणि नेमलं आहे; माझा हेतू हा
आहे की, तुम्ही जावं, पुष्कळ फळ द्यावं, तुमचं फळ
रहावं, आणि तुम्ही माझ्या नावानं पित्याजवळ जे काही
मागाल ते त्यानं तुम्हाला द्यावं. १७तुम्ही एकमेकांवर प्रीती
करावी म्हणून मी तुम्हाला ह्या गोष्टींची आज्ञा देतो.

१८"जग तुमचा द्वेष करीत आहे तर तुम्ही जाणता की,
त्यानं तुमचा द्वेष करायच्या अगोदर माझा द्वेष केला.
१९जर तुम्ही जगाचे असता तर जगाला त्याचे स्वतःचे
आवडले असते. पण तुम्ही जगाचे नाही, पण मी तुम्हाला
जगातून निवडलं आहे म्हणून जग तुमचा द्वेष करीत आहे.
२०मी तुम्हाला जे म्हटलं की, 'दास आपल्या धन्यापेक्षा
मोठा नाही' त्या वचनाची आठवण ठेवा. त्यांनी माझा
पाठलाग केला असेल तर ते तुमचा पाठलाग करतील;
त्यांनी माझं वचन पाळलं असेल तर ते तुमचंपण
पाळतील. २१पण ते माझ्या नावामुळं हे सगळं तुम्हाला
करतील; कारण ज्यानं मला धाडलं त्याला ते ओळखीत
नाहीत. २२मी जर आलो नसतो आणि त्यांच्याशी बोललो
नसतो तर त्यांच्याकडे पाप नसतं, पण आता त्यांच्या
पापाबद्दल त्यांच्याजवळ बहाणा नाही. २३जो माझा द्वेष
करतो तो माझ्या पित्याचाही द्वेष करतो. २४जर दुसऱ्या
कोणी केली नाहीत अशी कामं मी त्यांच्यात केली नसती
तर त्यांच्याकडे पाप नसतं. पण आता पाहूनही, त्यांनी
माझा आणि माझ्या पित्याचा द्वेष केला. २५पण 'त्यांनी
विनाकारण माझा द्वेष केला' हे त्यांच्या नियमशास्त्रात जे
वचन लिहिलं आहे ते पूर्ण व्हावं म्हणून हे होत आहे.
२६पण मी ज्याला पित्याकडून तुमच्याकडे धाडीन तो
कैवारी म्हणजे पित्यापासून निघणारा सत्याचा आत्मा
जेव्हा येईल तेव्हा तो माझ्याविषयी साक्ष देईल. २७आणि
तुम्हीही साक्ष द्याल, कारण तुम्ही प्रारंभापासून
माझ्याबरोबर आहा."

१६ "तुम्हाला अडथळा होऊ नये म्हणून
मी ह्या गोष्टी तुमच्याशी बोललो. २ते तुम्हाला
सभास्थानबहिष्कृत करतील; पण अशी घटका येत आहे
की, तेव्हा जो कोणी तुमचा वध करील तो देवाला सेवा
अर्पण करीत आहे असे समजेल. ३ते हे तुम्हाला करतील,
कारण त्यांनी पित्याला आणि मला ओळखलं नाही.

४"पण मी तुम्हाला ह्या गोष्टी ह्याकरता सांगितल्यात
की, मी तुम्हाला ह्याविषयी बोललो ह्याची, ती घटका
येईल तेव्हा तुम्हाला आठवण व्हावी. मी तुम्हाला,
प्रारंभापासून, ह्या गोष्टी सांगितल्या नाहीत, कारण मी
तुमच्याबरोबर होतो. ५पण ज्यानं मला धाडलं त्याच्याकडे
मी आता, जातो आणि तुमच्यातला कोणीही मला
विचारीत नाही, 'तू कुठं जातोस?' ६पण मी ह्या गोष्टी
तुमच्याशी बोलल्यामुळं तुमचं मन दुःखानं भरलं आहे.
७तरीपण मी तुम्हाला खरं सांगतो, मी जातो हे तुमच्या
हिताचं आहे, कारण मी गेलो नाही, तर कैवारी तुमच्याकडे
येणार नाही; पण मी गेलो तर मी त्याला तुमच्याकडे
धाडीन; ८आणि तो आल्यावर तो जगाची पापाविषयी,
नीतिमत्वाविषयी आणि न्यायाविषयी खातरी पटवील.
९पापाविषयी; कारण ते माझ्यावर विश्वास ठेवीत नाहीत.

१०नीतिमत्वाविषयी; कारण मी माझ्या पित्याकडे जातो,
आणि पुढं तुम्ही मला पाहणार नाही. ११आणि
न्यायाविषयी; कारण ह्या जगाच्या अधिपतीचा न्याय होत
आहे.

१२"मला तुम्हाला अजून पुष्कळ गोष्टी सांगायच्यात,
पण तुम्ही आता त्या सहन करू शकणार नाही. १३पण तो
सत्याचा आत्मा आल्यावर तो तुम्हाला सर्व सत्यात वाट
दाखवून नेईल कारण तो स्वतःचं सांगणार नाही; तो जे
ऐकेल ते तो सांगेल आणि येणाऱ्या गोष्टी तुम्हाला विदित
करील. १४तो माझं गौरव करील, कारण तो माझ्यातून
घेईल आणि तुम्हाला प्रगट करील. १५जे सर्व काही
पित्याजवळ आहे ते माझं आहे; म्हणून मी म्हटलं, तो
माझ्यामधून घेईल आणि तुम्हाला प्रगट करील.

१६"थोडा वेळ, आणि तुम्ही मला पाहणार नाही;
आणि पुन्हा, थोडा वेळ आणि तुम्ही मला पहाल."
१७तेव्हा त्याच्या शिष्यांतले कित्येक एकमेकांत म्हणाले,

"हा हे आपल्याला काय म्हणतो? 'थोडा वेळ, आणि
तुम्ही मला पाहणार नाही, आणि पुन्हा, थोडा वेळ आणि
तुम्ही मला पहाल;' आणि, 'कारण मी पित्याकडे जातो.' "
१८म्हणून ते म्हणाले,

"हा 'थोडा वेळ' हे काय म्हणतो? हा काय बोलतो ते
कळत नाही."
१९तेव्हा येशूने ओळखले की, ह्यांची आपल्याला
विचारायची इच्छा आहे, आणि तो त्यांना म्हणाला,

"मी म्हटले की, थोडा वेळ, आणि तुम्ही मला
पाहणार नाही, आणि पुन्हा, थोडा वेळ, आणि तुम्ही मला
पहाल, ह्याविषयी एकमेकांत प्रश्न करता काय? २०मी
तुम्हाला सत्य सत्य सांगतो, तुम्ही रडाल आणि आक्रोश
कराल, पण जग आनंद करील. तुम्ही दुःखित व्हाल, पण
तुमच्या दुःखाचा आनंद होईल. २१स्त्री प्रसूत व्हायची
असते तेव्हा तिला दुःख असतं, कारण तिची घटका
आलेली असते; पण मूल जन्मल्याबरोबर जगात एक
मनुष्य जन्मला आहे, ह्या आनंदामुळं तिला ते दुःख
आठवत नाही. २२आणि म्हणून, आता तुम्हाला दुःख
आहे; पण मी तुम्हाला पाहीन, आणि तुमचं मन आनंदित
होईल, आणि तुमच्यापासून तुमचा आनंद कोणी
हिरावणार नाही. २३आणि त्या दिवशी तुम्ही माझ्याजवळ
काही मागणार नाही. मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो, तुम्ही
माझ्या नावानं पित्याजवळ काही मागाल तर तो ते
तुम्हाला देईल. २४अजून तुम्ही माझ्या नावानं काही
मागितलं नाही; तुम्ही मागा, आणि तुमचा आनंद पूर्ण
व्हावा म्हणून तुम्हाला मिळेल.

२५"ह्या गोष्टी मी तुमच्याशी दाखल्यांत बोललो आहे;
पण जेव्हा मी तुमच्याशी दाखल्यांत बोलणार नाही पण मी
तुम्हाला उघडपणे पित्याविषयी सांगेन अशी घटका येत
आहे. २६त्या दिवशी तुम्ही माझ्या नावानं मागाल; आणि
मी तुम्हाला म्हणत नाही की, मी पित्याला तुमच्यासाठी
विनंती करीन; २७कारण पिता स्वतः तुमच्यावर प्रीती
करतो, कारण तुम्ही माझ्यावर प्रीती केली आहे आणि
विश्वास ठेवला आहे की, मी देवाकडून आलो आहे.
२८मी पित्याकडून निघालो आणि जगात आलो; पुन्हा, मी
जग सोडतो आणि पित्याकडे जातो."
२९त्याचे शिष्य त्याला म्हणाले,

"बघा, आता आपण उघडपणे बोलत आहा, दाखला
सांगत नाही. ३०आता आम्हाला कळलं आहे की,
आपल्याला सर्व काही कळतं आणि कोणी आपल्याला
विचारावं ह्याची आपल्याला गरज नाही. ३१ह्यावरून
आम्ही विश्वास ठेवतो की, आपण देवाकडून आलात."
येशूने त्यांना उत्तर दिले,

"तुम्ही आता विश्वास ठेवता काय? ३२बघा, जेव्हा
पांगाल, प्रत्येक जण आपल्या घरी, आणि मला एकटा
सोडाल अशी घटका येत आहे, हो, आता आली आहे;
पण मी एकटा नाही, कारण पिता माझ्याबरोबर आहे.
३३तुम्हाला माझ्या ठायी शांती मिळावी म्हणून मी ह्या
गोष्टी तुमच्याशी बोललो आहे. जगात तुमच्यावर दुःख
येईल; पण धीर धरा, मी जगाला जिंकलं आहे."

**१७** येशू हे बोलला, आणि त्याने वर
आकाशाकडे डोळे लावून म्हटले,

"बापा, घटका आली आहे; पुत्रानं तुझं गौरव करावं
म्हणून तुझ्या पुत्राचं गौरव कर. २कारण, तू जे त्याला दिले
आहेस त्या सर्वांना त्यानं सनातन जीवन द्यावं म्हणून तू
त्याला सर्व मनुष्यांवर अधिकार दिला आहेस. ३त्यांनी जो
तू एकच, खरा देव त्या तुला, आणि तू ज्याला पाठवलंस
त्या येशू ख्रिस्ताला ओळखावं हे सनातन जीवन आहे. ४तू
जे काम मला करायला दिलंस ते पूर्ण करून मी तुला
पृथ्वीवर गौरवलं आहे. ५आणि आता, बापा, हे जग
होण्याआधी मला जे तुझ्याजवळ होतं त्या गौरवात
तुझ्याजवळ माझं गौरव कर.

६"तू जे मला जगात दिलेस त्यांना मी तुझं नाव प्रगट
केलं. ते तुझे होते आणि ते तू मला दिलेस, आणि त्यांनी
तुझं वचन पाळलं आहे. ७त्यांना आता समजलं आहे की,
तू ज्या गोष्टी मला दिल्यास त्या सर्व तुझ्याकडून आहेत.
८कारण तू मला जी वचनं दिलीस ती मी त्यांना दिली
आहेत; आणि त्यांनी स्वीकारली, त्यांना खरोखर समजलं
की, मी तुझ्याकडून आलो, आणि त्यांनी विश्वास ठेवला
की, तू मला पाठवलंस. ९मी त्यांच्यासाठी विनंती करतो,
जगासाठी नाही; पण तू जे मला दिलेस त्यांच्यासाठी मी
विनंती करतो, कारण ते तुझे आहेत. १०आणि माझे सर्व
तुझे आहेत आणि तुझे माझे आहेत, आणि त्यांच्या ठायी
माझं गौरव झालं आहे. ११आणि आता, ह्यापुढं मी जगात
नाही; पण ते जगात आहेत आणि मी तुझ्याकडे येतो.
पवित्र बापा, तू जे मला दिलेस त्यांना तू आपल्या नावात
राख, म्हणजे आपण एक आहोत तसं त्यांनीही एक व्हावं.
१२तू जे मला दिलेस त्यांना, मी त्यांच्याबरोबर होतो तेव्हा,
तुझ्या नावात राखलं; मी त्यांचं रक्षण केलं, आणि
नाशाच्या पुत्राशिवाय त्यांच्यातून एकही बहकला नाही. हे
शास्त्रलेख पूर्ण व्हावा म्हणून झालं. १३आणि आता मी
तुझ्याकडे येतो. आणि, त्यांच्या ठायी पूर्ण झालेला माझा
आनंद त्यांना मिळावा म्हणून मी हे जगात बोलतो. १४मी
त्यांना तुझं वचन दिलं आहे, आणि जगानं त्यांचा द्वेष
केला आहे; कारण मीही जगाचा नाही तसे ते जगाचे
नाहीत. १५तू त्यांना जगातून काढून घ्यावंस अशी मी
विनंती करीत नाही, पण त्यांना वाइटापासून राखावंस.
१६जसा मीही जगाचा नाही, तसे ते जगाचे नाहीत. १७तू
त्यांना सत्यात समर्पित कर. तुझं वचन हे सत्य आहे. १८तू
मला जगात पाठवलंस तसंच मी त्यांना जगात पाठवलं
आहे. १९आणि तेही सत्यात समर्पित केले जावेत म्हणून
त्यांच्याकरता मी स्वतःला समर्पित करतो.

२०"मी केवळ त्यांच्यासाठी विनंती करीत नाही, पण
त्यांच्या शब्दावरून जे माझ्यावर विश्वास ठेवतील
त्यांच्यासाठीही विनंती करतो २१की, त्या सर्वांनी एक
व्हावं - बापा, जसा तू माझ्यात आहेस आणि मी तुझ्यात
आहे तसं त्यांनीही एक व्हावं - आणि जगानं विश्वास
ठेवावा की, तू मला पाठवलं आहेस. २२तू जे गौरव मला
दिलंस ते मी त्यांना दिलं आहे, ह्यासाठी की, आपण जसे
एक आहो तसं त्यांनी एक व्हावं - २३मी त्यांच्यात आणि
तू माझ्यात - ह्यासाठी की, एकात पूर्ण झालेले व्हावं;
आणि, जगाला समजावं की, तू मला पाठवलंस, आणि
माझ्यावर प्रीती केलीस तशीच त्यांच्यावर प्रीती केलीस.
२४बापा, माझी इच्छा आहे की, तू जे मला दिले आहेस
त्यांनीही मी असेन तिथं माझ्याबरोबर असावं, ह्यासाठी
की, तू मला दिलेलं माझं गौरव त्यांनी पहावं; कारण
जगाच्या स्थापनेअगोदर तू माझ्यावर प्रीती केलीस.

२५"नीतिमान बापा, जगानं तुला ओळखलं नाही, पण
मी तुला ओळखतो; आणि ह्यांनी ओळखलं आहे की, तू
मला पाठवलंस. २६मी त्यांना तुझं नाव कळवलं आहे
आणि मी कळवीन, ह्यासाठी की, तू ज्या प्रीतीनं माझ्यावर
प्रीती केलीस ती त्यांच्यात असावी आणि मी त्यांच्यात
असावं."

१८ हे बोलल्यावर येशू आपल्या
शिष्यांबरोबर किद्रोन ओहोळाच्या दुसऱ्या
बाजूस आला. तेथे एक बाग होती; आणि तो आत गेला -
तो स्वतः व त्याचे शिष्य - २आणि ज्या यहुदाने त्याला
धरून दिले त्यालापण ते ठिकाण माहीत होते. कारण तेथे
येशू पुष्कळ वेळा आपल्या शिष्यांबरोबर जात असे.
३आता यहुदाला वरिष्ठ याजक व परोशी ह्यांच्याकडून एक
शिपायांची तुकडी व कामदार मिळाल्यावर, तो दिवे,
मशाली व शस्त्रे घेऊन तेथे येतो.

४येशूला आपल्यावर येणाऱ्या सर्व गोष्टी माहीत
असल्यामुळे तो पुढे गेला आणि त्यांना म्हणाला,

"तुम्ही कोणाला शोधता?"

५त्यांनी त्याला उत्तर दिले,

"नासोरी येशूला."

तो त्यांना म्हणाला,

"मी तो आहे."

आणि ज्या यहुदाने त्याला धरून दिले तोपण
त्यांच्याबरोबर उभा होता. ६आणि जेव्हा तो त्यांना
म्हणाला, 'मी तो आहे' तेव्हा ते मागे सरले आणि
जमिनीवर पालथे पडले. ७मग त्याने त्यांना पुन्हा विचारले,

"तुम्ही कोणाला शोधता?"

आणि ते म्हणाले,

"नासोरी येशूला."

८येशूने उत्तर दिले,

"मी तुम्हाला सांगितलं, मी तो आहे; म्हणून मला
शोधीत असला तर ह्यांना जाऊ द्या."

[९]म्हणजे, 'तू जे मला दिलेस त्यांच्यातला एकपण मी गमावला नाही' असे तो जे बोलला होता ते वचन पूर्ण व्हावे.

[१०]तेव्हा शिमोन पेत्राजवळ तरवार असल्याने त्याने ती उपसली व श्रेष्ठ याजकाच्या दासावर वार करून त्याचा उजवा कान कापून टाकला. आता त्या दासाचे नाव मल्ख होते. [११]तेव्हा येशू पेत्राला म्हणाला,

"तरवार म्यानात घाल. पित्यानं मला जो प्याला दिला आहे तो मी पिऊ नये काय?"

[१२]तेव्हा शिपायांची तुकडी व सेनापती आणि यहुद्यांचे कामदार हे येशूला धरून बांधून, [१३]प्रथम हन्नाकडे घेऊन गेले. कारण, त्या वर्षी कयफा हा जो श्रेष्ठ याजक होता त्याचा हा सासरा होता, [१४]आणि ह्याच कयफाने यहुद्यांना मसलत दिली होती की, एका मनुष्याने लोकांसाठी मरावे हे हिताचे आहे.

[१५]तेव्हा शिमोन पेत्र येशूच्या मागोमाग गेला; तसाच दुसरा एक शिष्य गेला. तो शिष्य श्रेष्ठ याजकाच्या ओळखीचा होता, आणि येशूबरोबर श्रेष्ठ याजकाच्या वाड्यात गेला. [१६]पण पेत्र बाहेर, दाराशी उभा राहिला. म्हणून, तो श्रेष्ठ याजकाच्या ओळखीचा दुसरा शिष्य बाहेर आला, द्वारपालिकेशी बोलला आणि पेत्राला आत घेऊन आला. [१७]तेव्हा जी दासी द्वारपालिका होती ती पेत्राला म्हणते,

"तूपण ह्या मनुष्याच्या शिष्यांतला आहेस काय?"
तो म्हणाला,

"मी नाही."
[१८]तेथे जे दास व कामदार उभे होते त्यांनी थंडी असल्यामुळे कोळशांची आगटी केली होती, आणि ते शेकत होते. आणि पेत्रपण त्यांच्याबरोबर शेकत उभा होता.

[१९]मग श्रेष्ठ याजकाने येशूला त्याच्या शिष्यांविषयी व त्याच्या शिक्षणाविषयी प्रश्न केले. [२०]येशूने त्याला उत्तर दिले,

"मी जगाशी उघडपणे बोललो, मी नेहमी सभास्थानात आणि मंदिरात, जिथं यहुदी नेहमी असतात, तिथं शिकवलं. आणि गुप्तपणे मी काही बोललो नाही.
[२१]आपण मला कशाला विचारता? जे माझं ऐकत असत त्यांना मी काय सांगितलं ते त्यांना विचारा. बघा, मी काय बोललो हे त्यांना माहीत आहे."

[२२]तो असे बोलताच जवळ उभ्या असलेल्या कामदारांमधून एकाने त्याला थप्पड दिली व म्हटले,

"तू श्रेष्ठ याजकांना असं उत्तर देतोस काय?"
[२३]येशूने त्याला उत्तर दिले,

"मी वाईट बोललो असलो तर वाइटाविषयी साक्ष दे; पण बरोबर बोललो असलो तर तू मला का मारतोस?"
[२४]आता हन्नाने त्याला श्रेष्ठ याजक कयफा ह्याच्याकडे बांधून पाठवले.

[२५]आणि शिमोन पेत्र शेकत उभा होता; तेव्हा ते त्याला म्हणाले,

"तूपण त्याच्या शिष्यांतला आहेस काय?"
त्याने नाकारले व म्हटले,

"मी नाही."
[२६]पेत्राने ज्याचा कान कापला होता त्याचा नातलग असलेला, श्रेष्ठ याजकाच्या दासांतला एक जण म्हणतो,

"मी तुला त्याच्याबरोबर बागेत नाही बघितलं काय?"
[२७]तेव्हा पेत्राने पुन्हा नाकारले आणि, लगेच, कोंबडा आरवला.

[२८]तेव्हा ते येशूला कयफाकडून वाड्यात नेतात; तेव्हा सकाळ होती आणि विटाळ होऊ नये, पण वल्हांडणाचे भोजन करता यावे म्हणून ते स्वतः वाड्यात गेले नाहीत. [२९]म्हणून पिलात त्यांच्याकडे बाहेर गेला आणि म्हणाला,

"तुम्ही ह्या मनुष्याविरुद्ध काय आरोप आणता?"
[३०]त्यांनी त्याला उत्तर देऊन म्हटले,

"तो वाईट करणारा नसता तर आम्ही त्याला आपल्या हाती दिलं नसतं."
[३१]म्हणून पिलात त्यांना म्हणाला,

"त्याला तुम्हीच घ्या, आणि तुम्ही तुमच्या नियमशास्त्रानुसार त्याचा न्याय करा."
यहुदी त्याला म्हणाले,

"आम्हाला मरणाची शिक्षा द्यायची मोकळीक नाही."
[३२]तो कोणत्या मरणाने मरणार होता हे प्रगट करायला येशू बोलला होता ते वचन पूर्ण व्हावं म्हणून हे झाले.

[३३]म्हणून पिलात पुन्हा वाड्यात गेला; आणि त्याने येशूला बोलावले आणि म्हटले,

"तू यहुद्यांचा राजा आहेस काय?"
[३४]येशूने उत्तर दिले,

"आपण स्वतः हे म्हणता किंवा दुसऱ्यांनी आपल्याला माझ्याविषयी हे सांगितलं?"
३५ पिलाताने उत्तर दिले,

"मी यहुदी आहे काय? तुझ्याच लोकांनी आणि वरिष्ठ याजकांनी तुला माझ्या हाती दिलं; तू काय केलंस?"
३६ येशूने उत्तर दिले,

"माझं राज्य ह्या जगातलं नाही. माझं राज्य ह्या जगातलं असतं तर यहुद्यांच्या हाती मी दिला जाऊ नये म्हणून माझे कामदार लढले असते; पण माझं राज्य आता इथलं नाही."
३७ म्हणून पिलात त्याला म्हणाला,

"तर तू राजा आहेस काय?"
येशूने उत्तर दिले,

"मी राजा आहे असं आपण म्हणता. मी सत्याची साक्ष द्यावी ह्याकरता मी जन्मास आलो, आणि ह्याकरता मी जगात आलो. जो कोणी सत्याचा आहे तो माझा आवाज ऐकतो."
३८ पिलात त्याला म्हणतो,

"सत्य काय आहे?"
आणि हे म्हटल्यावर तो पुन्हा यहुद्यांकडे बाहेर गेला आणि त्यांना म्हणाला,

"मला त्याच्यात काही अपराध आढळत नाही.
३९ पण तुमच्यासाठी वल्हांडणात मी एकाला सोडावं अशी तुमच्यात प्रथा आहे; तर तुमच्यासाठी मी यहुद्यांच्या राजाला सोडावं अशी तुमची इच्छा आहे काय?"
४० तेव्हा पुन्हा ते ओरडून म्हणाले,

"ह्याला नाही, पण बरब्बाला."
आता बरब्बा एक लुटारू होता.

१९ म्हणून मग पिलाताने येशूला घेतले आणि फटके मारवले. २ तेव्हा शिपायांनी एक
काट्यांचा मुगुट गुंफून त्याच्या मस्तकावर घातला आणि
त्याला एक जांभळा झगा पेहरवला. ३ ते त्याच्यापुढे येऊ
लागले आणि म्हणू लागले,

"जयजय! यहुद्यांचे राजे!"
आणि त्यांनी त्याला थपडा दिल्या.

४ म्हणून पिलात पुन्हा बाहेर गेला, आणि त्यांना म्हणतो,

"बघा, मला त्याच्यात काही अपराध आढळत नाही,
हे तुम्हाला समजावं म्हणून मी त्याला तुमच्याकडे बाहेर
आणतो. ५ तेव्हा काट्यांचा मुगुट व जांभळा झगा
घातलेला येशू बाहेर आला. आणि पिलात त्यांना म्हणतो,

"बघा, हा मनुष्य!"
६ म्हणून वरिष्ठ याजक व कामदार त्याला बघून ओरडत म्हणतात,

"वधस्तंभावर खिळा, वधस्तंभावर खिळा."
पिलात त्यांना म्हणतो,

"त्याला तुम्हीच घ्या, आणि वधस्तंभावर खिळा; कारण मला त्याच्यात काही अपराध आढळत नाही."
७ यहुद्यांनी त्याला उत्तर दिले,

"आमच्याकडे एक नियम आहे आणि आमच्या नियमशास्त्रानुसार हा मेला पाहिजे; कारण ह्यानं स्वतःला देवाचा पुत्र केलं."

८ म्हणून पिलाताने हे बोलणे ऐकले तेव्हा तो
अधिकच भ्याला; ९ आणि पुन्हा वाड्यात गेला व येशूला
म्हणाला,

"तू कुठला आहेस?"
पण येशूने त्याला उत्तर दिले नाही. १० तेव्हा पिलात त्याला
म्हणतो,

"तू माझ्याशी बोलत नाहीस? मला तुला सोडून द्यायचा अधिकार आहे, आणि वधस्तंभावर खिळायचा अधिकार आहे हे तुला माहीत नाही काय?"
११ येशूने त्याला उत्तर दिले,

"आपल्याला तो वरून दिलेला नसता तर आपल्याला माझ्यावर अधिकार नसता, म्हणून ज्यानं मला आपल्या हाती दिलं त्याचं पाप मोठं आहे."

१२ ह्यावरून पिलाताने त्याला सोडायचा प्रयत्न केला, पण यहुदी ओरडून म्हणाले,

"आपण जर ह्याला सोडलंत तर आपण कैसराचे मित्र नाही; जो कोणी स्वतःला राजा करतो तो कैसराला नाकारतो."
१३ म्हणून पिलाताने हे बोलणे ऐकल्यावर येशूला बाहेर आणले. आणि ज्या जागेला फरशी म्हणतात (पण इब्री भाषेत गब्बाथा म्हणतात) तेथे तो न्यायासनावर बसला.

१४ तो वल्हांडणाच्या तयारीचा दिवस होता. आणि
तेव्हा सुमारे सहावा तास होता. आणि तो यहुद्यांना
म्हणतो,

"बघा, तुमचा राजा!"
[१५]पण ते ओरडले,
"वाट लावा, वाट लावा, त्याला वधस्तंभावर खिळा."
पिलात त्यांना म्हणतो,
"मी तुमच्या राजाला वधस्तंभावर खिळू काय?"
वरिष्ठ याजकांनी उत्तर दिले,
"आम्हाला कैसराशिवाय राजा नाही."
[१६]म्हणून मग, त्याने त्याला वधस्तंभावर खिळायला त्यांच्या हाती दिले.

[१७]**तेव्हा त्यांनी येशूला घेतले** आणि तो आपला वधस्तंभ घेऊन 'कवटीचे ठिकाण' म्हटलेल्या ठिकाणापर्यंत गेला. ह्याला इब्री भाषेत गुलगुथा म्हणतात.
[१८]त्या ठिकाणी त्यांनी त्याला व त्याच्याबरोबर दुसऱ्या दोघांना वधस्तंभावर खिळले - प्रत्येक बाजूस एकाला, आणि येशूला मध्यभागी - [१९]आणि पिलाताने एक फलक
लिहिला व तो वधस्तंभावर लावला; त्यावर लिहिले होते,
'यहुद्यांचा राजा नासरेथकर येशू'
[२०]आणि यहुद्यांतल्या पुष्कळांनी तो फलक वाचला. कारण येशूला जेथे वधस्तंभावर खिळले होते ते ठिकाण नगराच्या जवळ होते. तो इब्री, रोमी व हेल्लेणी भाषांत लिहिला होता. [२१]तेव्हा यहुद्यांचे श्रेष्ठ याजक पिलाताला
म्हणाले,
" 'यहुद्यांचा राजा' असं लिहू नका पण 'ह्याने म्हटले मी यहुद्यांचा राजा आहे' असं लिहा."
[२२]पिलाताने उत्तर दिले,
"मी लिहिलं ते लिहिलं."
[२३]मग शिपायांनी येशूला वधस्तंभावर खिळल्यावर त्याचे कपडे घेतले आणि प्रत्येक शिपायाला एक वाटा असे चार वाटे केले; आणि झगाही घेतला. ह्या झग्याला शिवण नव्हती; तो वरपासून थेट विणलेला होता.
[२४]म्हणून ते आपआपल्यात म्हणाले,
"आपण हा फाडू नये; पण तो कोणाचा होईल म्हणून त्याकरता चिठ्या टाकू."
हे ह्यासाठी झाले की,
'त्यांनी माझे कपडे आपल्यात वाटून घेतले,
आणि माझ्या झग्याकरता
त्यांनी चिठ्या टाकल्या,'
हा शास्त्रलेख पूर्ण व्हावा; म्हणून शिपायांनी ह्या गोष्टी केल्या.

[२५]**पण येशूच्या वधस्तंभाजवळ** त्याची आई, त्याच्या आईची बहीण व क्लोपाची बायको मरिया आणि
मग्दाली मरिया ह्या उभ्या होत्या. [२६]येशूने जेव्हा आपल्या
आईला व तो ज्या शिष्यावर प्रीती करीत असे त्याला जवळ उभे असलेले बघितले तेव्हा तो आपल्या आईला म्हणतो,
"बाई, बघ, तुझा पुत्र!"
[२७]मग तो त्या शिष्याला म्हणतो,
"बघ, तुझी आई!"
आणि त्या शिष्याने तिला त्या घटकेपासून आपल्याकडे घेतले.
[२८]मग, आता सर्व पूर्ण झाले आहे, हे येशू जाणत असल्यामुळे, (शास्त्रलेख पूर्ण व्हावा म्हणून) म्हणतो,
"मला तहान लागली आहे."
[२९]तेथे, एक आंबेने भरलेले भांडे ठेवलेले होते, आणि त्यांनी आंबेने भरलेला एक बोळा* एका एजोबाच्या
फांदीवर बसवून त्याच्या तोंडाला लावला. [३०]येशूने आंब
घेतल्यावर म्हटले,
"पूर्ण झाले."
आणि आपले मस्तक लववून त्याने प्राण सोडला.
[३१]तो तयारीचा दिवस होता, आणि शब्बाथ दिवशी वधस्तंभावर शरिरे राहू नयेत (कारण तो शब्बाथ मोठा दिवस होता) म्हणून यहुद्यांनी पिलाताला विनंती केली
की, त्यांचे पाय तोडून त्यांना काढून घ्यावे. [३२]तेव्हा
शिपाई आल्यावर त्यांनी त्याच्याबरोबर वधस्तंभावर खिळण्यात आलेल्या पहिल्याचे व दुसऱ्याचे पाय तोडले.
[३३]आणि ते जेव्हा येशूकडे आले, आणि तो मेला होता हे त्यांनी बघितले, तेव्हा त्याचे पाय त्यांनी तोडले नाहीत.
[३४]तरी शिपायांपैकी एकाने भाल्याने त्याच्या कुशीत विंधले; आणि, लगेच, रक्त व पाणी बाहेर आले.
[३५]आणि हे ज्याने पाहिले त्याने तुम्हीही विश्वास ठेवावा म्हणून साक्ष दिली आहे. आणि त्याची साक्ष खरी आहे; आणि तो खरे सांगत आहे हे त्याला माहीत आहे.
[३६]कारण,
'त्याचे एक हाड मोडणार नाही,'

---

* बोळा = स्पंज

हा शास्त्रलेख पूर्ण व्हावा म्हणून ह्या गोष्टी झाल्या.
३७आणि दुसरा एक शास्त्रलेख पुन्हा म्हणतो,
'त्यांनी ज्याला विंधले त्याच्याकडे ते पाहतील.'

३८ह्यानंतर, जो अरिमथाईचा योसेफ येशूचा
शिष्य होता, पण यहुद्यांच्या भीतीमुळे गुप्तपणे झाला होता,
त्याने आपल्याला येशूचे शरीर नेता यावे म्हणून
पिलाताला विनंती केली व पिलाताने त्याला परवानगी
दिली. म्हणून तो आला आणि त्याने येशूचे शरीर घेतले.
३९आणि, जो त्याच्याकडे रात्रीचा आला होता तो
निकदेमही तेथे आला; त्याने गंधरस व अगरू ह्यांचे सुमारे
शंभर मापे मिश्रण आणले. ४०मग त्यांनी येशूचे शरीर
घेतले, आणि यहुद्यांच्या पुरायच्या रीतीप्रमाणे त्यांनी ते
मसाल्यांसहित तागाच्या वस्त्रात गुंडाळले. ४१त्याला ज्या
ठिकाणी वधस्तंभावर खिळले होते तेथे एक बाग होती;
आणि त्या बागेत एक नवे थडगे होते; त्यात कोणाला
कधीही ठेवलेले नव्हते. ४२म्हणून त्यांनी, तो यहुद्यांचा
तयारीचा दिवस असल्यामुळे व ते थडगे जवळ
असल्यामुळे, त्यात येशूला ठेवले.

## २०

आठवड्याच्या पहिल्या दिवशी,
सकाळी अजून अंधार असताना, मग्दाली
मरिया थडग्याकडे येते; आणि थडग्यावरून शिळा
काढलेली पाहते. २तेव्हा ती धावत निघते आणि शिमोन
पेत्राकडे व ज्याच्यावर येशूची प्रीती होती त्या दुसऱ्या
शिष्याकडे येते व म्हणते,

"त्यांनी प्रभूला थडग्यातून काढून नेलं आणि त्याला
कुठं ठेवलं हे आम्हाला माहीत नाही."

३म्हणून पेत्र व तो दुसरा शिष्य बाहेर निघून
थडग्याकडे आले. ४म्हणून ते दोघे जण बरोबर धावत
निघाले; पण तो दुसरा शिष्य पेत्राच्या पुढे धावत गेला व
थडग्याजवळ प्रथम आला. ५आणि तो ओणवला तेव्हा
त्याने तागाची वस्त्रे ठेवलेली पाहिली. पण तो आत गेला
नाही. ६त्याच्या मागोमाग येत असलेला शिमोन पेत्र तेव्हा
येतो; आणि तो थडग्यात गेला; आणि तागाची वस्त्रे
ठेवलेली पाहतो ७व त्याच्या डोक्याभोवतालचा रुमाल
त्या तागाच्या वस्त्रांबरोबर ठेवलेला नाही, पण एका जागी
वेगळा गुंडाळून ठेवलेला पाहतो. ८तेव्हा जो थडग्याशी
प्रथम आला होता तो दुसरा शिष्य आत गेला व त्याने
बघितले आणि विश्वास ठेवला. ९कारण त्याने मेलेल्यांतून
पुन्हा उठावे ह्याचे अगत्य आहे, हा शास्त्रलेख त्यांना
अजून कळला नव्हता. १०मग ते शिष्य पुन्हा आपल्या घरी
गेले.

११पण मरिया थडग्याजवळ बाहेर रडत उभी राहिली,
आणि ती रडत असता थडग्यात ओणवली; १२आणि
येशूचे शरीर आधी ठेवलेले होते तेथे तिने दोन देवदूत
पाहिले; ते शुभ्र वस्त्रे परिधान करून बसले होते - एक
डोक्याकडील बाजूस आणि एक पायांकडील बाजूस -
१३आणि ते तिला म्हणतात,

"बाई, तू का रडतेस?"

ती त्यांना म्हणते,

"कारण त्यांनी माझ्या प्रभूला काढून नेलं, आणि
त्याला कुठं ठेवलं ते मला माहीत नाही."

१४ती एवढे बोलल्यावर मागे वळली, आणि उभ्या
असलेल्या येशूला पाहते; पण तो येशू आहे हे तिला
समजले नाही. १५येशू तिला म्हणतो,

"बाई, तू का रडतेस? तू कुणाला शोधतेस?"

ती त्याला माळी समजून त्याला म्हणते,

"महाराज, तुम्ही त्याला इथून नेलं असेल तर कुठं
ठेवलंत ते मला सांगा म्हणजे मी त्याला घेऊन जाईन."

१६येशू तिला म्हणतो,

"मरिये,"

ती वळते व इब्री भाषेत त्याला म्हणते,

"रब्बोनी," (म्हणजे गुरू)

१७येशू तिला म्हणतो,

"मला धरू नकोस; कारण, मी अजून पित्याकडे वर
गेलो नाही; पण माझ्या बांधवांकडे जा, आणि त्यांना
सांग, 'जो माझा पिता आणि तुमचा पिता, माझा देव आणि
तुमचा देव आहे त्याच्याकडे मी वर जातो.' "

१८मग्दाली मरिया गेली आणि तिने 'मी प्रभूला पाहिले'
आणि तो तिच्याशी ह्या गोष्टी बोलला हे शिष्यांना
सांगितले.

१९तेव्हा त्याच दिवशी, आठवड्याच्या पहिल्या
दिवशी संध्याकाळी, यहुद्यांच्या भीतीमुळे, शिष्य जेथे
जमले होते तेथील दारे बंद असताना येशू आला व
मध्यभागी उभा राहिला; आणि त्यांना म्हणतो,

"तुम्हाला शांती असो."

२०आणि हे बोलल्यावर त्याने त्यांना आपले हात दाखवले
आणि कूस दाखवली; आणि शिष्यांनी प्रभूला बघितले

तेव्हा ते आनंदित झाले २१ तेव्हा येशू त्यांना पुन्हा
म्हणाला,

"तुम्हाला शांती असो. जसं पित्यानं मला पाठवलं
तसंच मी तुम्हाला धाडतो."
२२ एवढे बोलल्यावर त्याने त्यांच्यावर फुंकर टाकली
आणि तो त्यांना म्हणतो,

"पवित्र आत्म्याचा स्वीकार करा. २३ तुम्ही ज्यांची
पापं सोडाल त्यांना ती सोडलेली आहेत आणि ज्यांची
ठेवाल ती ठेवलेली आहेत."

२४ **पण येशू आला असताना,** बारांतला एक,
ज्याला दिदुम म्हणत तो थोमा त्यांच्याबरोबर नव्हता.
२५ म्हणून दुसरे शिष्य त्याला म्हणाले,

"आम्ही प्रभूला पाहिलं."

तेव्हा तो त्यांना म्हणाला,

"मी त्याच्या हातांत खिळ्यांची खूण बघितल्याशिवाय, खिळ्यांच्या जागी माझं बोट घातल्याशिवाय, आणि त्याच्या कुशीत माझा हात घातल्याशिवाय मी विश्वास ठेवणार नाही."

२६ **आणि पुन्हा, आठ दिवसांनी,** त्याचे शिष्य
घरात होते आणि थोमा त्यांच्याबरोबर होता; आणि दारे
बंद असताना येशू आला व मध्यभागी उभा राहिला,
आणि म्हणाला,

"तुम्हाला शांती असो."
२७ मग तो थोमाला म्हणतो,

"तुझं बोट पुढं कर, आणि माझे हात बघ; तुझा हात पुढं कर आणि माझ्या कुशीत घाल; आणि विश्वासहीन होऊ नकोस पण विश्वास ठेवणारा हो."
२८ आणि थोमाने त्याला उत्तर देऊन म्हटले,

"माझा प्रभू आणि माझा देव!"
२९ येशू त्याला म्हणतो,

"तू मला पाहिलंस म्हणून विश्वास ठेवलास. ज्यांनी बघितलं नाही आणि विश्वास ठेवला आहे ते धन्य!"

३० **आणि ह्या पुस्तकात** लिहिली नाहीत अशी
दुसरीही पुष्कळ चिन्हे येशूने आपल्या शिष्यांसमोर केली.
३१ पण ही ह्यासाठी लिहिली आहेत की, येशू हा देवाचा पुत्र
ख्रिस्त आहे, असा तुम्ही विश्वास ठेवावा. आणि तुम्ही
विश्वास ठेवल्याने तुम्हाला त्याच्या नावात जीवन
मिळावे.

२१ **आणि ह्या गोष्टीनंतर** पुन्हा तिबिर्याच्या
समुद्राजवळ येशूने शिष्यांना स्वतःस प्रगट
केले; आणि अशा प्रकारे स्वतःस प्रगट केले. २ शिमोन पेत्र
व ज्याला दिदुम म्हणत तो थोमा, गालिलातील काना
येथील नथनेल व जब्दीचे पुत्र, आणि त्याच्या शिष्यांतील
दुसरे दोघे जण हे बरोबर होते. ३ शिमोन पेत्र त्यांना
म्हणतो,

"मी मासे धरायला जातो."

ते त्याला म्हणतात,

"आम्हीपण तुझ्याबरोबर येतो."

ते बाहेर गेले आणि लगेच एका मचव्यात चढले आणि
त्या रात्री त्यांनी काही धरले नाही.

४ पण आता सकाळ होतेवेळी येशू किनाऱ्याजवळ
उभा होता, पण तो येशू होता हे शिष्यांना समजले नाही.
५ तेव्हा येशू त्यांना म्हणतो,

"मुलांनो, तुमच्याजवळ काही खायला आहे काय?"

ते त्याला म्हणाले,

"नाही."
६ आणि तो त्यांना म्हणाला,

"मचव्याच्या उजवीकडे जाळं टाका आणि तुम्हाला मिळेल."

म्हणून ते टाकतात, आणि त्यांना माशांच्या घोळक्यामुळे
ते आता ओढवेना.

७ तेव्हा ज्याच्यावर येशू प्रीती करीत असे तो शिष्य
पेत्राला म्हणतो,

"तो प्रभू आहे."

शिमोन पेत्राने ऐकले की, तो प्रभू आहे, तेव्हा तो उघडा
असल्यामुळे त्याने कमरेला झगा गुंडाळला आणि समुद्रात
उडी टाकली. ८ आणि दुसरे शिष्य त्या लहान मचव्याने ते
माशांचे जाळे ओढीत आले. (कारण ते किनाऱ्यापासून
फार दूर नव्हते, पण सुमारे दोनशे हातांवर होते.)

९ तेव्हा ते किनाऱ्यावर बाहेर आल्यावर तेथे
कोळशांचा विस्तव पाहतात, आणि त्यावर ठेवलेली
मासळी आणि भाकर. १० येशू त्यांना म्हणतो,

"तुम्ही आता धरलेल्या मासळीमधून काही आणा."

११तेव्हा शिमोन पेत्र वर गेला व त्याने ते जाळे किनाऱ्यावर
ओढले. ते मोठ्या माशांनी भरलेले होते. ते एकशे त्रेपन्न
होते, आणि ते इतके होते तरी ते जाळे फाटले नव्हते.

१२येशू त्यांना म्हणतो,

"या, जेवा."

तेव्हा शिष्यांतील कोणीदेखील त्याला विचारू शकला
नाही की, 'आपण कोण आहा?' कारण तो प्रभू आहे हे
त्यांना समजले होते. १३तेव्हा येशू येतो, भाकर घेतो आणि
त्यांना देतो; आणि त्याचप्रमाणे मासळी देतो. १४येशू
मेलेल्यांतून उठल्यानंतर त्याची शिष्यांना प्रगट व्हायची ही
तिसरी वेळ आहे.

१५मग ते जेवल्यावर येशू शिमोन पेत्राला म्हणतो,

"योहानाच्या पुत्रा, शिमोना, तू माझ्यावर ह्यांपेक्षा अधिक प्रीती करतोस काय?"

तो त्याला म्हणतो,

"हो, प्रभू, तू जाणतोस की, मी तुझ्यावर प्रीती करतो."

तो त्याला म्हणतो,

"माझी कोकरं चार."

१६तो पुन्हा दुसऱ्यांदा त्याला म्हणतो,

"योहानाच्या पुत्रा, शिमोना, तू माझ्यावर प्रीती करतोस काय?"

तो त्याला म्हणतो,

"हो, प्रभू, तू जाणतोस की, मी तुझ्यावर प्रीती करतो."

तो त्याला म्हणतो,

"माझी मेंढरं राख."

१७तो तिसऱ्यांदा त्याला म्हणतो,

"योहानाच्या पुत्रा, शिमोना, तू माझ्यावर प्रीती करतोस काय?"

पेत्र दुःखी होऊ लागला; कारण तो तिसऱ्यांदा त्याला म्हणाला, 'तू माझ्यावर प्रीती करतोस काय?' आणि तो त्याला म्हणाला,

"प्रभू, तुला सर्व माहीत आहे, तू जाणतोस की, मी तुझ्यावर प्रीती करतो."

येशू त्याला म्हणतो,

"माझी मेंढरं चार."

१८"मी तुला सत्य सत्य सांगतो, तू जेव्हा तरुण होतास तेव्हा आपली कंबर बांधून तुझी इच्छा असेल तिकडे जात होतास; पण तू जर्जर होशील तेव्हा आपले हात पुढं करशील, दुसरा तुझी कंबर बांधील आणि तुझी इच्छा नसेल तिकडे तुला नेईल."

१९(तो कोणत्या मरणाने देवाचे गौरव करणार होता हे प्रगट करायला तो हे बोलला.) आणि हे बोलल्यावर तो त्याला म्हणतो,

"माझ्यामागं ये."

२०तेव्हा पेत्र मागे वळतो आणि पाहतो की, येशू
ज्याच्यावर प्रीती करीत असे तो मागोमाग येत आहे.
त्याच शिष्याने भोजनाच्या वेळी त्याच्या छातीशी लागून
म्हटले होते की, 'प्रभू, तुला धरून देणारा कोण आहे?'
२१म्हणून, त्याला बघून, पेत्र येशूला म्हणतो,

"प्रभू, ह्याचं काय?"

२२येशू त्याला म्हणतो,

"मी येईपर्यंत त्यानं रहावं अशी जर माझी इच्छा असेल तर त्याचं तुला काय? तू माझ्यामागं ये."

२३तेव्हा बांधवांत हे बोलणे पसरले की, तो शिष्य मरणार नाही. पण येशू त्याला म्हणाला नव्हता की, तो मरणार नाही, पण 'मी येईपर्यंत त्याने रहावे अशी जर माझी इच्छा असेल तर तुला काय?'

२४जो ह्या गोष्टींची साक्ष देतो व ज्याने ह्या गोष्टी लिहिल्या आहेत तोच हा शिष्य आहे; आणि त्याची साक्ष खरी आहे हे आम्हाला माहीत आहे.

२५आणि ह्याशिवाय येशूने केल्या अशा पुष्कळ गोष्टी आहेत; त्या एक एक लिहिण्यात आल्या तर जी पुस्तके लिहिण्यात येतील ती जगातदेखील मावणार नाहीत असे मला वाटते.